मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी
द्वारा संचालित



महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी

जि. गडचिरोली

नॅक पुनर्मानांकित 'अ' दर्जा

शब्दशिल्प

२०२२

(स्वातंत्र्य अमृत महोत्सव विशेषांक)

☎ (07137) 266043/ 266558 www.mgcollegearmori.org
mgcollege.armori@gmail.com

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी

(स्वातंत्र्य अमृत महोत्सव विशेषांक)

*** मुख्य संपादक**

प्रा. डॉ. नोमेश मेश्राम
प्रा. डॉ. विजय रैवतकर
प्रा. डॉ. किशोर वासुर्के

*** सहायक संपादक**

प्रा. दिलीप घोनमोडे
प्रा. स्नेहा मोहुर्ले
प्रा. अनिल राऊत
प्रा. वैभव पडोळे

*** संपादन सहाय्य**

कु. रेश्मा चंदनखेडे (विद्यार्थी प्रतिनिधी)
कु. मिताली मंडल (विद्यार्थी प्रतिनिधी)
कु. प्राची सहारे (विद्यार्थी प्रतिनिधी)
कु. समिक्षा उईके (विद्यार्थी प्रतिनिधी)

*** प्रकाशक**

डॉ. लालसिंग खालसा
प्राचार्य, महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी

*** अक्षर जुळवणी व मुद्रण**

विवेक मुद्रणालय
कारगील चौक, गडचिरोली – ४४२६०५
मो. ८८८८६०३८३३

सर्वाधिकार प्रकाशकाकडे सुरक्षित

स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात प्राणांची आहुती देऊन
भारतमातेसाठी सर्वस्व त्यागलेल्या तमाम ध्येयवेड्या
स्वतंत्रता सेनानी व क्रांतिकारकांना समर्पित...

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी

आमचे प्रेरणास्थान

दलितमित्र

स्वर्गीय वामनरावजी वनमाळी

संस्थापक अध्यक्ष

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी, जि. गडचिरोली

आमचे प्रेरणास्थान

स्वर्गीय मुरलीधरराव वामनरावजी वनमाळी

अध्यक्ष

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी, जि. गडचिरोली

स्वर्गीय अब्दुलभाईजी पंजवानी

संस्थापक कार्याध्यक्ष

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी, जि. गडचिरोली

आमचे मार्गदर्शक

श्री. रिद्धेश्वर वामनरावजी वनमाळी

सचिव

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी, जि. गडचिरोली

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी

* कार्यकारी मंडळ *

अध्यक्ष

श्रीमती सुनिताताई मुरलीधरराव वनमाळी

उपाध्यक्ष

श्री. नुरअल्लीभाई अब्दुलभाई पंजवानी

सचिव

श्री. रिद्धेश्वर वामनरावजी वनमाळी

कोषाध्यक्ष

श्री. हरिश्चंद्र महादेवराव बोंदरे

सहसचिव

श्री. दिपकराव बळीरामजी बेहरे

सदस्य

श्री. नामदेवराव काशिनाथजी सोरते

सदस्य

श्री. मयुर मुरलीधरराव वनमाळी

सदस्य

श्री. उमाकांत हरिभाऊ वनमाळी

सदस्य

श्री. धनंजय वामनरावजी वनमाळी

सदस्य

श्री. दिपक वामनरावजी वनमाळी

सदस्य

श्री. प्रकाश मोहन भोयर

प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. नसरूद्दीनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालय,
आरमोरी, जि. गडचिरोली

महाविद्यालयातील प्रशस्त प्रयोगशाळा आणि ग्रंथालय

* प्राचार्यांचे मनोगत *

आमच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला, कल्पनांना आणि विचारांना चालना देणारा, त्यांच्या लेखनकौशल्याला हक्काचे व्यासपीठ बहाल करणारा 'शब्दशिल्प-२०२२' हा वार्षिकांक वाचकांच्या हाती सोपविताना मनस्वी आनंद होत आहे. हा वार्षिकांक म्हणजे आमच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या प्रतिभेचा शब्दाविष्कारच. आमच्या 'शब्दशिल्प' २०१५-१६ या वार्षिकांकास गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या वतीने आयोजित वार्षिकांक स्पर्धेत विद्यापीठस्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. तसेच शब्दशिल्प २०१६-१७ आणि शब्दशिल्प-२०१४-१५ या दोन्ही वर्षी प्रकाशित झालेल्या आमच्या वार्षिकांकाला विद्यापीठस्तरीय द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. तसेच २०१७, २०१८, २०२० च्या वार्षिकांकानासुध्दा उत्कृष्ट वार्षिकांक म्हणुन विद्यापीठाने गौरवान्वीत केले. त्याबद्दल प्रथमतः मी 'शब्दशिल्प' च्या प्रकाशनाची धुरा समर्थपणे उचलणाऱ्या संपादक मंडळातील डॉ. नोमेश मेश्राम, डॉ. विजय रैवतकर आणि डॉ. किशोर वासुर्के यांचे अभिनंदन करतो व गोंडवाना विद्यापीठाचेही आभार मानतो.

शब्दशिल्प वार्षिकांक-२०२२ प्रकाशित करीत असतांना अत्यांनद होत आहे, कारण सदर वार्षिकांक स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात प्रकाशित होत आहे. देशभर एक ना अनेक उपक्रम राबवून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. या वार्षिकांकात विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या गाभ्याला धरुन आपल्या प्रतिभेचा, विचारांचा आणि आपल्या कल्पनेचा शब्दाविष्कार अत्यंत उत्तमरित्या केला आहे व त्यातून राष्ट्रप्रेम, देशप्रेम, राष्ट्रध्वज या विषयीची अनुपम श्रद्धा व्यक्त केली. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपूर्ण देशभर साजरा होत असतांना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शब्दशिल्प वार्षिकांकासाठी भारतीय स्वातंत्र्याशी सबंधित विविध विषयांवर आपले मंथन करुन शब्दफुलांनी शब्दशिल्प कोरले याबद्दल विद्यार्थ्यांचे मी अभिनंदन करतो आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यातील लेखनाविष्कारासाठी शुभेच्छा चिंतितो.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व त्यांच्या प्रतिभेला दिशा मिळावी, त्यांच्या निर्मिती आणि सर्जनप्रेरणेचा विकास होण्याच्या दृष्टीने 'शब्दशिल्प'ची निर्मिती करण्यात आली. या माध्यमातून विद्यार्थ्यांची कलाजाण आणि महाविद्यालयाच्या उत्तरोत्तर प्रगतीची वाटचाल आपणासमोर मांडण्याचा प्रयत्न केला गेला.

महाराष्ट्रातील गडचिरोलीसारख्या अतिदुर्गम जिल्ह्यात सन १९८१ मध्ये स्व. वामनरावजी वनमाळी यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या महाविद्यालयाच्या या इवल्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ येथे या महाविद्यालयाचे सन्मानपूर्वक नाव

घेतले जाते. या महाविद्यालयाचे नॅकद्वारा पुनर्मूल्यांकन झाले असून महाविद्यालयाला 'अ' दर्जा प्राप्त झाला, ही आम्हा सर्वांसाठी अतिशय अभिमानाची अशी गोष्ट आहे.

संस्थापक अध्यक्ष स्व. वामनरावजी वनमाळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी या दुर्गम, मागासलेल्या भागातील तरुण पिढीला उच्च शिक्षणाची दारे खुले करण्याचे जे स्वप्न पाहिले होते त्या स्वप्नांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने आमचे महाविद्यालय अग्रणी राहिले आहे. उच्चशिक्षण, कौशल्य विकास आणि ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्व निर्माण करण्यासाठी महाविद्यालय सतत धडपड करीत असते.

महाविद्यालयाची भव्य वास्तू, प्रशस्त पटांगण, अत्याधुनिक उपकरणांनी युक्त वर्गखोल्या, प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय आकर्षणाचे केंद्र आहेत. आज ग्रंथालयात हजारो पुस्तके तसेच जर्नल्स उपलब्ध आहेत. याचा फायदा आदिवासी ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना होत आहे. याचा मनस्वी आनंद होतो.

महाविद्यालयात पदवी स्तरावर तीनही शाखेत जवळजवळ सगळेच विषय उपलब्ध आहेत. कला शाखेत मराठी, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व विज्ञान शाखेत गणित, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र अशा विषयांत पदव्युत्तर शिक्षण घेण्याची सोय आहे. शिवाय गणित, प्राणिशास्त्र, मराठी, इतिहास, समाजशास्त्र या विषयांत आचार्य पदवीकरिता संशोधन केंद्राची मान्यता असून महाविद्यालयात संशोधन कार्य करण्याची उत्तम सोय आहे. या ज्ञानपरिसरात ज्ञानदानाबरोबर समाजोपयोगी असे संशोधनकार्य संशोधन केंद्राद्वारे केले जाते, हे विशेष.

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाने व महाविद्यालयातील प्रशासनाने नेहमीच शिक्षणातील अत्याधुनिक दृष्टिकोणाचा स्वीकार केला. त्यानुसार महाविद्यालयात Microbiology, Geology, Environmental Science, Music, Home Science असे महत्त्वपूर्ण विषय सुरू करण्यात आले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व स्व. वामनरावजी वनमाळी यांच्या प्रेरणेतून व सामाजिक बांधीलकीतून संस्था व महाविद्यालय सतत कार्य करीत आली आहे. त्यानुसारच विद्यार्थ्यांना महापुरूषांचे विचार व कार्य यांची माहिती व्हावी या उदात्त हेतूने डॉ. आंबेडकर अध्ययन व संशोधन केंद्र आणि महात्मा गांधी अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्रही सुरू करण्यात आले. त्यानुसार पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण दिले जाते.

आमच्या महाविद्यालयाद्वारे कौशल्य विकासावर नेहमीच भर देण्यात येतो. महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत 'कम्युॅनिटी कॉलेज' स्थापन करण्यात आले असून या अंतर्गत 'ड्रेस डिझायनिंग' या रोजगाराभिमुख शिक्षणाची उत्तम सोय करण्यात आली आहे. शिवाय सेरिकल्चर, सर्टिफिकेट कोर्स इन मेंटनन्स ऑफ होम अप्लायन्सेस, स्पोकन इंग्लिश, ऑफिस ऑटोमेशन, ट्रायबल टुरिझम अशा विविध रोजगारक्षम व्यावसायिक शिक्षणाची सोय महाविद्यालयात आहे. विद्यार्थ्यांना एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी., स्टॉफ सिलेक्शन, रेल्वे, बँकिंग अशा विविध क्षेत्रांत यशस्वी होण्याच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली आणि त्यादिशेने सातत्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करून त्यांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर करण्यासाठी प्रधानमंत्री कौशल विकास योजनेंतर्गत ड्रेस डिझायनिंग कोर्स महाविद्यालयात सूरू करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात सदोदीत अग्रेसर असलेल्या आमच्या महाविद्यालयाची उन्नत भारत अभियान राबविण्यासाठी केंद्रशासनाने निवड केली

तसेच उच्चशिक्षणात भरीव कामगिरी करण्यासाठी व महाविद्यालयात आधारभूत सुविधांच्या विकासासाठी रूसाकडून (राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान) महाविद्यालयाची निवड झाली ही आमच्या दृष्टीने निश्चितच अभिमानास्पद बाब आहे.

महाविद्यालय क्रीडा क्षेत्रात अग्रेसर राहिला आहे. विविध खेळांत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरांवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाने महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंत सामाजिक उत्तरदायित्वातून समाजोपयोगी कार्य केले आहे. विद्यार्थ्यांत सामाजिक भान विकसित करण्याच्या दृष्टीने या विभागाचे प्रयत्न सातत्याने सुरू असतात. महाविद्यालयाने २०१५ ते २०१९ पर्यंत दत्तक ग्राम योजनेंतर्गत कासवी हे आरमोरी तालुक्यातील गाव सामाजिक बांधीलकीतून दत्तक घेतले होते. तसेच उन्नत भारत अभियान अंतर्गत अंतरजी, रामपुरी, आष्टा, कासवी, पालोरा या गावांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आरोग्य, कृषी अशा विविध क्षेत्रांत गावाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे, हे आमचे ध्येय आहे. त्या दिशेने महाविद्यालय व्यवस्थापन, प्रशासन व महाविद्यालयातील कर्मचारीवृंदाच्या पुढाकारातून सातत्याने समाजोपयोगी विविध उपक्रम तेथे राबविले जात आहेत.

कोविड काळातही महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले. महाविद्यालयाने शासनाद्वारे चालविलेल्या विविध सामाजिक–सांस्कृतिक उपक्रमांत सातत्याने सहभाग घेतला आहे. महाविद्यालयाचा शासन स्तरावर नेहमीच गौरव करण्यात आला. २०१३–१४, २०१४–१५ या सत्रांत सलग दोनदा शासनाचा जिल्हास्तरीय आणि विद्यापीठस्तरीय जागर जाणिवांचा पुरस्कार, रस्ता सुरक्षा राज्यस्तरीय पुरस्कार महाविद्यालयास प्राप्त झाले असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाविद्यालयाच्या उल्लेखनीय कामगिरीचा हा सन्मान आहे, ही निश्चितच संस्थेसाठी सन्मानाची बाब आहे.

महाविद्यालय सामाजिक बांधीलकीतून आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या, मागासवर्गीय, अल्पसंख्याक, अपंगासाठी अनेक प्रकारची आर्थिक सहायता देते. सर्व शासकीय सोयी, सवलती व शिष्यवृत्ती महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना देण्यात येतात. त्यांना सर्वोतोपरी मदत करण्याची भावना महाविद्यालयात कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांमध्ये आहे. हे मला अभिमानाने सांगावेसे वाटते.

संस्थेत कार्यरत सर्व विद्याशाखेतील प्राध्यापक, कर्मचारी आधुनिक दृष्टीचा स्वीकार करण्यास तत्पर आहेत. उच्चशिक्षित तसेच आचार्य पदवी संपादन केलेले प्राध्यापक मंडळी संस्थेत आहेत. ते ज्ञानक्षेत्रात उत्तरोत्तर संशोधनकार्य करीत आहेत. महाविद्यालयातील बहुतांश प्राध्यापकांनी विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे बृहत व लघू संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. महाविद्यालयातील प्राचार्य तसेच प्राध्यापकवृंद यांनी अमेरीका, ताईवान, श्रीलंका या देशांत आपल्या शोधनिबंधांचे सादरीकरण केले. विविध स्तरांवरील चर्चासत्र, कार्यशाळा आणि परिषदा यांत महाविद्यालयातील प्राध्यापकांचा सहभाग असतो. तसेच त्यात ते शोधनिबंधांचे वाचन करतात, ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदा, संमेलने याचे आयोजन महाविद्यालय निरंतर करीत असतो. या विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यात सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक मूल्यांचा विकास करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरीचे अध्यक्ष स्व. किशोरभाऊ वनमाळी यांचे या संस्थेच्या विकासात अनन्यसाधारण योगदान आहे. विद्यमान सचिव मा. मनोजभाऊ वनमाळी आणि संस्थेचे समस्त

पदाधिकारी तसेच संपूर्ण विद्याशाखांचे प्रमुख सदैव गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे ध्येय बाळगून बदलत्या काळानुसार विद्यार्थी व एकूणच समाजहिताच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना आणण्यासाठी प्रयत्नशील असतात. महाविद्यालयातील भव्य इंडोअर स्टेडीअम, 'कम्युॅनिटी कॉलेज' हे त्याचेच फलित होय. पुढेही असे उपक्रम आणण्यास संस्था व महाविद्यालय तत्पर आहे.

अत्याधुनिक शिक्षणप्रणालीचा महाविद्यालयाने स्वीकार केला. ज्ञान आणि कौशल्यविकास यावर अधिक भर दिला जात आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी ज्ञानसंपन्न व स्वावलंबी कसे होतील, समाजात उत्तम नागरिक म्हणून त्यांना ओळख कशी मिळेल यासाठी संस्था प्रामाणिक व जबाबदारीने गेल्या कित्येक दशकांपासून निष्ठेने कार्य करीत आहे.

'शब्दशिल्प' या वार्षिकांकाचा विद्यार्थ्यांच्या साहित्यिक विकासात महत्त्वपूर्ण वाटा असतो. प्रत्येकात एक कलावंत दडलेला असतो. प्रत्येकाची कला ही समोर येईलच, असे सांगता येत नाही. यासाठी 'शब्दशिल्प' सारखे व्यासपीठ हवेच. आमच्या विद्यार्थ्यांच्या प्रतिभेने संपन्न झालेला लेखनप्रपंच म्हणजे 'शब्दशिल्प'! या वार्षिकांकात समाविष्ट लेखक, कवी नवोदित व उदयोन्मुख आहेत. त्यांच्या लेखनकलेला दाद देऊन त्यांचा उत्साह वाढत राहो व त्यांचे साहित्यविश्व असेच फुलत राहो त्यातून एखादा सर्जनशील कवि–कलावंत निर्माण व्हावा अशी मंगलकामना करतो. आणि विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक प्रयत्न सुरू ठेवून सर्व क्षेत्रात यशाची सर्वोच्च शिखरे गाठावी अशी अपेक्षा करतो.

– डॉ. लालसिंग खालसा
प्राचार्य
महात्मा गांधी कला, विज्ञान व
स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी

* संपादकीय *

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्याने प्रकाशित होत असलेल्या आमच्या शब्दशिल्प – २०२२ या वार्षिकांकात लेख, कविता, कथा इत्यादी साहित्य देऊन आमचा राष्ट्रप्रेमाने नटलेला वार्षिकांक साकार करण्यात सहकार्य करणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थीनींचे सर्वप्रथम अभिनंदन करतो. आज संपूर्ण भारतात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अतिशय उत्साहात व जल्लोषात साजरा केला जात आहे. या निमित्याने भारत मातेच्या थोर सुपुत्रांना, महान क्रांतीकारकांना विनम्र वंदन करुन त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी प्रस्तुत शब्दशिल्प या विशेषांकाचे प्रयोजन आहे. भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण होत असल्याबद्दल व जनतेच्या देहामनात या रोमहर्षक स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती कायम तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक, क्रांतिकारक तसेच स्वातंत्र्य लढ्यात घडलेल्या विविधांगी घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे, देशभक्तीची जाज्ज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात रहावी या उदात्त उद्देशाने आपल्या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपुर्वक संस्मरण करण्यासाठी आपल्या देशात 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महाविद्यालयाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने सामुहिक राष्ट्रगीत, परिसर स्वच्छता, रॅली, तिरंगा वाटप, घरोघरी ध्वजारोहण, देशभक्तीपर गायन, देशभक्तीपर नृत्य, अशी अनेक उपक्रमे राबविली. यातीलच एक उपक्रम म्हणजे संपुर्णपणे राष्ट्रप्रेमाला समर्पित असलेले हे 'शब्दशिल्प–२०२२'वार्षिकांक!.

महात्मा गांधी महाविद्यालयाच्या विद्यार्थी मित्र–मैत्रिणींच्या प्रतिभेचा सहजसुंदर आविष्कार असलेले 'शब्दशिल्प' सहृदय रसिक वाचकांच्या हाती सोपवताना मनस्वी आनंद होत आहे. आमच्या 'शब्दशिल्प' २०१५–१६ ला गोंडवाना विद्यापीठाचा प्रथम क्रमांकाचा 'उत्कृष्ट वार्षिकांक पुरस्कार' मिळाला. सन २०१६–१७, २०१७–१८, २०१८–१९ मध्ये सुद्धा 'शब्दशिल्प' ला विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट वार्षिकांक पुरस्कार प्राप्त झाला. साहित्याच्या अनेक रसिकांनी आमची सर्व वार्षिकांक वाचल्यानंतर नेहमीच अंकाच्या उत्तमतेची पावती दिली. 'शब्दशिल्प' २०१४–१५ ला सुध्दा विद्यापीठाचा द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. याबद्दल विद्यापीठ व सर्वांचे धन्यवाद वार्षिकांकाचा संपादक या नात्याने व्यक्त करतो.

आरमोरीसारख्या ग्रामीण व आदिवासीबहुल भागात वास्तव्य करणारी व तथाकथित शहरी संस्कृतीपासून दूर असणारी गडचिरोली जिल्ह्यातील ही मुले साहित्यसृष्टीच्या उंबरठ्यावर अजूनही धडपडताहेत. असे असले तरी प्रस्तुत 'शब्दशिल्प' त्यांच्या आंतरिक भावना व संवेदना यांचे सच्चे प्रतिबिंब आहे, यात तिळमात्र शंका नाही.

सृजनशीलतेच्या हिरव्याकंच उद्यानात उमललेल्या नवोनवोन्मेषी फुलकळ्यांचा शब्दसुगंध म्हणजे 'शब्दशिल्प' म्हणजे आमच्या तरुणांच्या हळुवार भावनाचे शब्दरूप ! विचार, भावना, कल्पना, चिंतनाच्या वारूवरून अखिल विश्वाची केलेली स्वैर मुशाफिरी म्हणजे 'शब्दशिल्प'! आणि 'शब्दशिल्प' म्हणजे मनोहरभाई

शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी द्वारा संचालित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. नसरूद्दीनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालयाने आपल्या विद्यार्थ्यांचे लेखनकौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी हक्काचे उपलब्ध करून दिलेले व्यासपीठ होय.

झाडीपट्टीचा परिसर हा अनेक गुणी कवी, लेखक, कलावंताची खाण आहे. आरमोरीतील आमच्या महाविद्यालयानेही अनेक कवी, कलावंत, साहित्यिक झाडीपट्टीला दिले आहेत. प्रतिभावंतांच्या प्रतिभेला पंख देण्याचे, व्यक्तिमत्त्व विकसित करण्याचे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाचे भान निर्माण करण्याचे व त्यांच्या कल्पकतेला चालना देण्याचे कार्य महाविद्यालय अव्याहतपणे करीत आहे. विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन प्रतिभेला जागृत करण्याच्या उद्देशानेच आम्ही सातत्याने वार्षिकांक प्रकाशित करतो.

'शब्दशिल्प' २०२२ या वार्षिकांकासाठी विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवरील साहित्य मागविण्यात आले. याला कला, विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखेतील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजजीवन, भारतीय क्रांतिकारक, भारतीय सामाजिक विचारवंत, पुढारलेला भारत, भारताची विविध क्षेत्रात झालेली नेत्रदिपक प्रगती, भारतीय संस्कृती इ. विषयांवरील लेख, कविता प्राप्त झाल्यात. यापैकी काही लेख, कविता अस्सल व प्रातिभिक चुणूक दाखवणाऱ्या आहेत. तर काही विद्यार्थ्यांना निरंतर परिश्रम, वाचन व चिंतनाची गरज आहे हे प्रकर्षाने नोंदवावेसे वाटते.

'शब्दशिल्प' आकाराला येण्यात खरी प्रेरणा आहे ती मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. मनोजभाऊ वनमाळी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांची. तसेच माझ्यासोबत संपादनाचे कार्य करणारे मराठी विभागाचे प्रा. डॉ. विजय रैवतकर, डॉ. किशोर वासुर्के तसेच संपादक मंडळातील प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. स्नेहा मोहुर्ले, प्रा. अनिल राऊत, प्रा. वैभव पडोळे यांनी 'शब्दशिल्प' पूर्णत्वाला नेण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे आभार. तसेच विद्यार्थ्यांकडून साहित्य संकलन करणारे संपादक मंडळाचे विद्यार्थी प्रतिनिधी कु. रेश्मा चंदनखेडे, कु. मिताली मंडल, कु. प्राची सहारे, कु. समिक्षा उईके या विद्यार्थ्यांचेही मनस्वी आभार. 'शब्दशिल्प' या विद्यार्थ्यांच्या साहित्यिक अभिव्यक्तीचे दर्शन घडविणाऱ्या वार्षिकांकात समाविष्ट आमचे नवोदित कवी, लेखक तसेच हे वार्षिकांक प्रकाशित करण्यासाठी ज्या प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्या सर्वांचे व या वार्षिकांकाची सुबक छपाई अल्पावधित करून दिल्याबद्दल विवेक मुद्रणालय, गडचिरोली येथील श्री. विवेक घोंगडे व रोशन होकम यांचे आभार मानून या 'शब्दशिल्प' च्या निर्मितिकार्यातील सर्व सर्जनशील विद्यार्थी, विद्यार्थीनींना त्यांच्या उज्वल साहित्यिक भविष्यासाठी मनःपूर्वक सदिच्छा देतो. विद्यार्थी मित्रांनी याहूनही सकस व सामाजिक बांधिलकीने ओतप्रोत असलेले लेखन करावे व राष्ट्रविकासाच्या उदात्त कार्यात स्वयंप्रेरणेने सहभागी व्हावे अशी आशा बाळगतो. प्रसिध्द कवी दुष्यंतकुमार त्यागी म्हणतात –

हो गई है पीर पर्वतसी अब पिघलनी चाहिए
इस हिमालय से कोई गंगा निकलनी चाहिए।
सिर्फ हंगामा खड़ा करना मकसद नही है मेरा
मेरी कोशिश ये है की ये सूरत बदलनी चाहिए।

– प्रा. डॉ. नोमेश मेश्राम
संपादक

* अनुक्रमणिका *

शब्दशिल्प २०२२
(स्वातंत्र्य अमृत महोत्सव विशेषांक)

मराठी विभाग

स्वातंत्र्योत्तर चळवळीतील चिमूर क्रांतीत राष्ट्रसंतांचे योगदान	१–४
शूरवीरांना	५
देशभक्ती गीत	५
धडा देशप्रेमाचा	६
जय हिंद	६
भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचे योगदान	७–१०
ऋण या जन्माचं	१०
भारतीय स्वातंत्र्यसेनानी यांच्या जीवनावरील कविता	११–१४
भारतीय स्वातंत्र्यसेनानी व आंदोलने	१५–१६
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव केवळ इव्हेंट ठरु नये	१७–१८
जय भारत	१९
अजूनही कानात माझ्या	१९
भारत के सैनिक	२०
सरदार वल्लभभाई पटेल जीवनकार्य	२१–२२
असा भारत हवयं	२२
भारतीय संस्थानाच्या विलीनीकरणात सरदार पटेल यांची भूमिका	२३–२५
स्वातंत्र्यानंतर भारतापुढील आव्हाने	२६–२७
मला अपेक्षित भारत	२८–२९
देशभक्ती	३०
भगत सिंगाच्या स्वप्नातील स्वतंत्र भारत आणि आजचा भारत	३१–३२
मी पाहिलेला महापूर	३३
सहा कविता	३४–३६
काही कविता	३७–३९
वर्तमान भारत : विकास आणि विषमता	४०–४१
माझ्या स्वप्नातील भारत	४२
राष्ट्रीय पर्यावरण असंतुलन आणि राष्ट्रीय पर्यावरणीय कायदे	४३–४४
घटनाकार भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर	४५–४६
माई सावित्री ती	४६
पर्यावरण संरक्षण : काळाची गरज	४७–४८
भारतीय शेती आणि हवामान बदलाचे धोके	४९–५०

इंग्रजी विभाग

Challenges in Healthcare after Indian Independent	51
Investment Opportunities in India's Healthcare Sector	52
India of my Dreams	53
Changing India	54
Go Ahead! Go Ahead!	55
Love of Physics and Hunger	56
Our Flag	56
This is Land of	57
I Love my Nation	57
Indian Culture	58
A Story of a Mother	59
Interest	60
Skill India, Swaccha Bharat, Made in India, Digital India	61-62
Patriotism and its Examples Introduction	63-65
Article On Digital India	66-67
Ideal Village	68
Pre-Independence India	69
Various Historical Event Related To Independence	70-71

हिंदी विभाग

भारत की आजादी में सुभाषबाबू का योगदान	७२–७३
आजादी के अमृत महोत्सव में युवाओ का कर्तव्य	७४–७५
आजादी का आंदोलन और डॉ. आंबेडकर	७६–७७
समाज संस्कारहीन बनकर न रह जाये	७८–८०
भारत की बढती आबादी	८१–८३

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे,
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे,
मतभेद नसू दे ।।

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

मराठी विभाग

स्वातंत्र्योत्तर चळवळीतील चिमूर क्रांतीत राष्ट्रसंतांचे योगदान

■ **रागिणी सहारे** एम. ए. (मराठी) भाग २

राष्ट्रपिता म. गांधींनी १९४२ साली ८ ऑगस्टला 'करेंगे या मरेंगे' असा संदेश दिला आणि सारा भारत देश जागा झाला. या स्वातंत्र्याच्या संग्रामात आपणहून अनेकांनी उडी घेतली. लाखो भारतवासी घरादारावर तुळशीपत्र ठेवून 'स्वराज्य आम्ही मिळविणारच !' म्हणत या यज्ञकुंडात सामील झाले. एक विशिष्ट ध्येय उराशी बाळगून हृदयातील गुरुदेवाला जागृत करत स्वातंत्र्यदेवतेसाठी अहोरात्र झटले. अशा वीररत्नांत वं. राष्ट्रसंत तुकडोजी अग्र आहेत. १६ ऑगस्ट १९४२ च्या चिमूर क्रांती संग्रामात राष्ट्रसंतांनी व त्यांच्या वीररस पूर्ण अभिव्यक्तीनी अनेक योद्धे निर्माण केले. भजनांनी व आपल्या अमृतवाणीने एक आगळं लोकोद्धारक चैतन्य लोकांत संचारलं. सदैव क्रांतीचे गीत गात देवभक्तीकडून देशभक्तीकडे महाराजांचा प्रवास झालेला दिसतो. या दृष्टीने राष्ट्रसंत चिमूर क्रांतिपर्वाचे मुकुटमणी ठरतात. चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर हे गाव १९४२ च्या क्रांतीने जगभर गाजले. या क्रांतिपर्वाची तयारी महाराजांनी आधीपासून केली होती. राष्ट्रसंत म्हणत, 'जग हे नेहमीच क्रांतिशील आहे; क्रांती हा त्याचा जन्मसिद्ध हक्कच आहे. ते सर्व बाजूंनी सदैव क्रांतीचे गीत गात चालले असते... जगाचा तोल क्रांतीद्वारे एका सुवर्णमध्यावर आणून ठेवायचा असतो. या वयातच जगाला शांती लाभते. ज्यांना हा मध्यबिंदू ओळखून कार्य करण्याची दृष्टी आलेली असते, तेच समाजाचे खरे पुढारी समजले पाहिजेत. हे कार्य एकट्याने होणारे वा एकट्याकरिताच करावयाचे नसल्यामुळे त्याला आश्रम, शाळा, कीर्तने, व्याख्याने इत्यादी साधनांद्वारे 'सर्वामुखीमंगल' बोलवून कार्य करावे लागते.' (श्रीगुरूव.पू.अं. १०) यानुसारच महाराज कार्यसंयोजन करीत आले होते. केवढी तरी कार्यशक्ती व सेना महाराजांनी निर्माण केली होती. वं. महाराजांनी आपल्या क्रांतीला 'बॉंब'चं रूप न देता 'वीणे' चं रूप दिलं होतं. 'वीणा आपल्या झंकाराने विषारी सर्पालाही वश करू शकते! आपल्या प्रभावी स्वरांनी अंधारात दीपही उजळू शकते आणि सर्वांच्या

हृदयात झोपलेल्या प्रभूला जागृत करून जगाला स्वर्गही बनवू शकते' (क्रांतिवीणा–संदेश) हा महाराजांचा विश्वास वाणीवीणेद्वारे प्रभावी कार्य करीत होता. वाणी जेव्हा वीणेचं काम करते तेव्हाच क्रांती, परिवर्तन व बदल घडू शकतो, असे क्रांतिदूताला नेहमी वाटे.

चिमूर परिसराचा विचार करता साधारणतः १९२६ ते १९४२ या सोळा वर्षांच्या काळात चिमूर क्षेत्रात सर्वांत अधिक कुणाचा प्रभाव पडला असेल तर तो राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा आहे. या काळात संपूर्ण जनमत महाराजांच्या बाजूने होते. महाराजांचे बालपणही या परिसरात गेले असल्यामुळे अनेक मित्र, भक्त, आप्तस्वकीय महाराजांचे निर्माण झाले होते. अतिशय आदराने व सन्मानपूर्वक महाराजांचे नाव येथील लोकांचे ओठी तेव्हाही होते, आजही आहे. रामदेघी–नेरी–चिमूर–गोंदेडाकडील सर्व आयाबाया, पाटील–मालगुजार आदी प्रेमीजन महाराजांना 'देवबाबा' म्हणत. याला कारणही तसेच होते. शब्दांची कसरत, खंजिरीची मोहिनी, भजनांची अमृतधारा अणि सर्वांप्रती असलेला मायेचा जिव्हाळा, प्रेमाचा ओलावा, भक्तिरसाचा गिलावा येथील जनमानसांवर खोल पडला होता आणि म्हणूनच या देवबाबाची हाक आली की हजारो लोक जमत. शेकडो युवक देवबाबाची आज्ञा मानत. त्यांचे शब्द ऐकण्यासाठी सर्वांचे कान आसुसलेले असे. चिमूरच्या क्रांती संग्रामात या देवबाबाने देश तारण्यासाठी स्वातंत्र्यवीरांना संजीवनी दिली.

इथल्या क्रांतीने जगाचे लक्ष वेधले. २१ क्रांतिवीरांना फाशीची शिक्षा, २८ क्रांतिवीरांना जन्मठेप, ३०० चिमूरवासीयांना ब्रिटिशांनी अटक केली आणि तीन क्रांतिवीर हुतात्मे झाले. चिमूर परिसरात 'भारत छोडो', 'चले जाव', 'चालते व्हा' असे विदर्भवासी ब्रिटिश सत्तेला सांगायला विसरले नाहीत. या क्रांतीचे स्फुल्लिंग गावागावांत, गल्लीबोळात उमटत होते. ८ ऑगस्ट १९४२ ला म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू या नेत्यांनी 'करा अथवा मरा' हा नारा दिला आणि भारतातील लोकमानस नव्या स्फूर्तीने पेटून उठले. ब्रिटिशांनी स्वातंत्र्य नेत्यांना ९–१० ऑगस्टला अटक केली, पण भारतवासी थांबले नाहीत. स्वातंत्र्य चळवळ नेताहीन झाली, पण चळवळीची वाताहत झाली नाही. आता हीच चळवळ जनतेची झाली. 'चले जाव'च्या गर्जनेने देशातील सारी शहरे, सारी गावे पेटून उठली. यात चिमूरची क्रांती लक्षवेधी आहे. यात राष्ट्रसंतांचे योगदान बहुमोल मानावे लागेल. 'देश हमारा हिंदुस्थान । रखेंगे हम उसकी शान' असा जयघोष साऱ्या आसमंतात दुमदुमत होता. मातीतली माणसं या चळवळीत पेटून

उठत होती. ते जळते दिवस होते. या जळत्या दिवसावर ब्रिटिश सत्ता पाणी टाकायला निघाली पण ही चळवळ पूर्ण विझवू शकली नाही. चिमूर पेटून उठले. ही वीरांची भूमी ठरली. राष्ट्रसंतांच्या प्रेरणेने म. गांधींच्या संदेशाने ही चळवळ चिमुरात फोफावली. 'उठा जागे व्हा, देशासाठी प्राणाची बाजी लावा' 'ब्रिटिश सत्तेचा बीमोड करा, गुलामगिरी संपवा' या नाऱ्यांनी चिमूर दुमदुमले. राष्ट्रसंतांच्या क्रांती दौऱ्याने इतिहास रचला. वं. राष्ट्रसंत महाराज अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे धनी होते. देवभक्ती व देशभक्ती ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत, असे ते मानीत. ते देवभक्तीत देश पाहात व देशभक्तीत देव जाणत होते. म्हणूनच धार्मिक, सामाजिक, राष्ट्रीय संस्था महाराजांच्या मार्गदर्शनासाठी त्यांच्याभोवती फिरत

होत्या. हिंदू असो वा मुसलमान सगळेच महाराजांना मानाचा मुजरा व त्यांचा आदर करीत असत. अनेकांना महाराज आधारवड वाटत. राष्ट्रसंत १३ ऑगस्ट १९४२ ला चिमूरला आले. या वेळी आष्टीचे रामचंद्र जवळेकर, महादेव बिजवे, वरखेडचे नारायण बोकडे महाराजांसोबत होते. ही क्रांतिज्योत जेव्हा चिमूरला आली तेव्हा तिथल्या कार्यकर्त्यांना अधिकच स्फूर्ती आली. दादाजी कोहळे, बालाजी रायपूरकर, उद्धवराव कारेकर आदी मंडळींनी महाराजांच्या क्रांतिज्योतीचे हार्दिक स्वागत केले. ही चेतनारॅली अनेकांच्या अचेतन मनाला चेतना देऊन गेली. त्यामुळे क्रांतीचे बीज रोवले गेले. वं. महाराजांचे भाषण व क्रांतीभजन हा चिमूरवासीयांसाठी स्फूर्तिदायक ठेवा होता. त्यांच्या वाणीतून समोरच्यांच्या मनात नवचेतना संचारे. काही वीरश्रीचे आदर्श महाराज राष्ट्रधर्माची प्रतीके म्हणून वापरीत. त्यामुळे स्फूर्ती निर्माण होत असे. लोकजागरणाचे कार्य करताना राष्ट्रसंत भाषणाच्या आधी जमलेल्यांना अनेकविध संबोधने वापरीत. भारतीय हिंदू वीरांनो ! संतांनो नि लोकांनो ! श्रीकृष्णाच्या भक्तांनो ! आर्याच्या बंधूनो ! मारुतीच्या मुलांनो ! वीर तरुणांनो ! वारकऱ्यांनो ! वीर सैनिकांनो ! श्रीमंतांनो ! गरिबांनो ! शक्तिदूतांनो ! इत्यादी संबोधनांनी ते आपल्या भाषणाची सुरुवात करून आवाहन करीत. जनतेची नाडी ओळखूनच महाराज भाषणाची सुरुवात करीत. १३, १४ आणि १५ ऑगस्ट १९४२ च्या रात्री महाराजांची चिमुरात जाहीर स्फूर्तिदायक भजने झालीत. भजनाच्या प्रत्येक शब्दात देशभक्तीची धग होती. ब्रिटिशांना स्पष्ट शब्दांत सुनावत युवकांच्या सळसळत्या रक्ताला देशासाठी वाट मोकळी करण्याकरिता इंग्रजांविरुद्ध लढण्याकरिता महाराजांची ही भजने महाभाष्ये ठरली. त्यांनी देशप्रेमाची प्रेरणा निर्माण केली.

१६ ऑगस्ट १९४२ चा दिवस रविवार, नागपंचमी सेवादलाचे कार्यकर्ते उद्धवराव खेमसकर यांनी बिगुल फुंकला. सारे स्वयंसेवक अभ्यंकर चौकात जमले. प्रभात फेरी किल्याजवळ येताच पोलिसांनी धाड टाकली. हिंसक वळण लागू नये म्हणून स्वयंसेवकांच्या लाठ्या परत घेतल्या. महाराजांची राष्ट्रीय भजनं गात प्रभातफेरी निघाली.

'वीरगर्जना' गर्जू लागली. 'चमकू द्या रक्त वीरांचे । उघडू द्या कर्ण शूरांचे । फोडू द्या भंड क्रूरांचे ।।' असे म्हणत भराभर लोक प्रभात फेरीत जमा होऊ लागले. 'प्यारा हिंदुस्थान है । गोपालोंकी शान है । वीरों का मैदान है, जिसमें भक्तों के भगवान है ।' हे महाराजांचे नुसते भजनच नव्हते तर एक उत्कृष्ट संचलन गीत होते. म्हणण्यात प्रखरता होती. देशभक्तीचा ध्यास होता, स्वातंत्र्याची आस होती. इंग्रजांचे अत्याचार वाढले. तेव्हा ब्रिटिश साम्राज्याला उघड उघड धक्का देणारं आणि संघटनेचं बळ वाढविण्यासाठी महाराज एक क्रांतिकारी भजन मोठ्या आवेशात म्हणत. ते गीत म्हणजे, 'अब काहे को धूम मचाते हो, सारे ? दुखवाकर–भारत आते है नाथ हमारे' या गीताने इंग्रजांच्या आसुरी सत्तेतून लोकांना सोडविण्यासाठीचे बळ दिले. यानंतर महाराजांना नागपूरच्या सेंट्रल जेलमध्ये २० सप्टेंबर पर्यंत ठेवण्यात आले. त्यानंतर रायपूर जेलमध्ये नेण्यात आले. महाराज तिथे क्र. ४९७ क्लास १ मध्ये बंदिस्त होते. जेलमध्ये असताना या राष्ट्रसंताला काहीही वाटले नाही. कारागृहाला मंदिर मानून महाराज जेलमध्ये राहिले. बंदिगृहात भजन गायिले, लिहिले. कारागृहातील कैद्यांना प्रबोधन केले. यावेळी महाराजांचा आचार्य विनोबा भावे यांच्याशी जवळून परिचय झाला. राष्ट्रसंतांच्या बहुगुणी व्यक्तित्वामुळे सारे भारावले व तुरुंगातून सुटकेसाठी जनतेने प्रयत्न केले. भक्तांनी जेलसमोर सत्याग्रह करण्याची तयारी केली. शेवटी ५ डिसेंबर १९४२ च्या केसरीत मथळा छापून आला की,'चिमूर काण्डच्या कारणामुळे मध्यप्रदेश सरकारने संत तुकडोजींना स्थानबद्ध करून ठेवले होते, परंतु यास लोकमतानी विरोध केल्यामुळे त्यांना तुरुंगातून मुक्त केले आहे.' राष्ट्रसंतांचे तुरुंगातील जीवन पाहून अनेकांनी त्यांना प्रणाम केला. ०२ डिसेंबर १९४२ ला सुटका करण्यात आली होती. पण वर्धा, चंद्रपूर जिल्ह्यात त्यांना प्रवेशबंदी होती. ही तब्बल पावणेतीन वर्षे प्रवेशबंदी होती. प्रवेशबंदी असली तरी महाराजांची चौफेर व चौकस नजर होती.

आष्टी–चिमूरमधील स्वातंत्र्य संग्रामाचे जनक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आहेत, असा गुप्त अहवाल इंग्रजांना माहीत झाला. चंद्रपूरला २८ ऑगस्टला पहाटेस बाबूपेठेतील चातुर्मास्य शिबिरात असताना सुब्रह्मण्यम व सर्कल इन्स्पेक्टर शर्मा यांनी राष्ट्रसंतांना अटक केली. महाराज हसत हसत म्हणाले, 'अच्छा जी, चलिये ! 'चिमूर क्रांतीनंतर राष्ट्रसंतांना अटक तर झालीच पण न्यायाधीश विकेन्डनने चिमूरच्या २१ क्रांतिवीरांना फाशी व २८ क्रांतिवीरांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ३५ क्रांतिवीरांना पाच वर्षांपेक्षा अधिक मुदतीचा सश्रम कारावास व १३८ क्रांतिवीरांना पाच वर्षांपेक्षा कमी मुदतीचा सश्रम कारावास देण्यात आला. यात कर्तेपुरुष, गरीब कामगार, मजूर होते. त्यांच्या कुटुंबाची वाताहत झाली. महाराजांनी यांच्यासाठी सहायता निधी जमवून ग्रामोद्योग केंद्र उभारले. २७५० रुपयांचा निधी महाराजांनी पाठविला व बंदी उठविल्यानंतर स्वतः केंद्राला भेट दिली. सांत्वन केले. मानवतेच्या पूजाऱ्याने अभूतपूर्व क्रांती केली. राष्ट्रसंताचे चिमूर क्रांतीचे योगदान ऐतिहासिक असून प्रेरणा देणारे आहे.

शूरवीरांना

■ **प्रदिप गजबे** बी. ए. भाग १

देऊनिया आहुती प्राणांची,
वाचविले आपल्या भारतभूमीला .
संकटे सारी स्वतःची झेलुनी,
स्वतःच्या तनाच्या चिंधड्या होऊनी,
जीवन आपुले त्यागले या कर्मभूमीला
मनी ध्यानी नसतांना,
अचानक आलेला वारशत्रूचा झेलुनी,
कवटाळले ज्या देशवीरांनी मृत्यूला
सदैव असेन प्रणाम माझा,
शहीद झालेल्या देशभक्तांना ..
भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या
शूरवीरांना ..

देशभक्ती गीत...

■ **एम. एस. मंडल** बी. ए. भाग २

मेरा भारत, मेरा भारत
मेरा भारत हि मेरी पहचान है।
मेरी जान, मेरा तुही अभिमान है।
मेरा भारत, मेरा भारत ।।धृ।।
मेरा देश हि है
मेरा लिए खास
मै करता हु
मेरे तिरंगे से प्यार ।।१।।
मै कही भी रहु
मै कही भी जाऊ
मै करता रहुंगा
मेरे तिरंगे से प्यार
मेरे तिरंगे से ही प्यार ।।२।।

धडा देशप्रेमाचा

■ **शशीकला आहा** बी. ए. भाग १

मान्य कि कोणत्या मातीत जन्म घेणं,
हे आपल्या हातात नसतं;
पण त्याच मातीशी ईमान राखणं,
यालाच बहुदा देशप्रेम असं नाव असतं...
पण तेव्हा धर्म, जाती, पंथ सारं
फक्त चार भितीपुरतं असायला हवं
आणि घरचा उंबरा ओलांडला कि,
मग प्रत्येकाने फक्त देशभक्त दिसायला हवं...
छे! छे! गरज नाही कि तुम्ही
सैन्यात पोलिसातच जायला हवयं
इमाने इतबारे सारं काम करा तूमचं
देशाला तुमच्याकडून अजून काय हवयं?...
हो! पण तुमच्यातलं थोडसं राखून
बघा एखाद्या गरजूलाही काही देता येईल...
तुम्हालाही मिळेल समाधान थोडं,
आणि त्याच्या चेहऱ्यावरही हसू येईल...
अशीच एकमेकांना साथ देऊन
नवा देश घडवायचाय..
.आणि इथल्या मातीमध्ये पुन्हा

जय हिंद

■ **कु. वैशाली भगवंतराव गाढवे**
बी. ए. भाग ३

दिले मिळवूनी स्वातंत्र्य आम्हा राखली रे लाज
चला आळवू तयांना जय हिंद बोलू आज
जोवरी आहे सृष्टी सृष्टीत त्याचा त्याग
चला आळवू तयांना जय हिंद बोलू आज
जय हिंद जय हिंद जय जय जय हिंद ।।धृ।।

गुलामी पाहिली ती व्यथा ही साहिली ती
बेजार होतो जनता रक्तात न्हालीती
मदमस्त सत्तेचा त्यांचा जिरविला माज
चला आळवू तयांना जय हिंद बोलू आज
जय हिंद जय हिंद जय जय जय हिंद ।।१।।

ओढूनी खांद्यावरी कफण होती रे डोळे लाल
हाती धरून फिरती क्रांतीची रे मशाल
घरदार सोडुनिया निघाले विश्व विजयास
चला आळवू तयांना जय हिंद बोलू आज
जय हिंद जय हिंद जय जय जय हिंद ।।१।।

भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील स्त्रियांचे योगदान

■ **कु. मालविका प्रदीप नन्नावरे** बी. ए. भाग ३

इ. स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. त्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी लाखो-करोडो स्त्री-पुरुष व बालक-बालके यांनी आपले प्राण दिले आहेत. १९९७ ते १९९८ हे भारताच्या स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवाचे वर्ष, स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेली ५० वर्षे स्त्रियांच्या स्वातंत्र्ययुद्धातील कामगिरीकडे सतत दुर्लक्ष झाले आहे. महिला नेत्यांचे गुणगाण अवश्य झाले परंतु आपण एक गोष्ट विसरलो. आंदोलनाला कर्तबगार नेत्यांची आवश्यकता असते त्यापेक्षा कितीतरी पटीने बलिदान करायला निघालेल्या स्वयंसेवकांची असते. म्हणूनच या बड्या नेत्यांबरोबर समाजातील सर्व थरांतील महिलांनी कोणती कामगिरी केली हेही पाहणे जरुरीचे आहे. भारताचा पहिला स्वातंत्र्यसंग्राम १८५७ मध्ये झाला. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध म्हटले की आपल्याला झाशीची राणी आठवते.

राणी लक्ष्मीबाईने फक्त युद्धाचे नेतृत्व केले नाही, तर मध्यप्रदेशातील स्त्रियांना युद्धाच्या कामात सहभागी करण्यास प्रेरणा व उत्तेजन दिले. लक्ष्मीबाईच्या दोन दासी काशी व सुंदर या युद्धकलेत प्रवीण होत्या, त्यांची राणीवर फार मोठी निष्ठा होती. राणी ग्वाल्हेरच्या किल्यातून दासीच्या वेशात रात्रीची निघून गेली. काशीने विधवा राणीचा वेष केला व राणीच्या पलंगावर झोपून राहिली. सुंदर शेवटपर्यंत राणीबरोबरच लढत राहिली, हुतात्मा झाली. लक्ष्मीबाईने स्त्रियांना गट लढाईचे शिक्षण देऊन तयार केले. घोड्यावर बसणे, बंदुका व तोफा चालविणे, भालाफेक, तलवारीचे हात व पोहणे आदी शिक्षण देऊन तयार केले. असे शिक्षण या गटातील महिलांना दिले जाई, ललिता बक्षी नावाची एक प्रसिद्ध घोडेस्वार राणीच्या सेनेत होती.

झलकारी नावाची एक दलित महिला गस्त घालणे, गवंडीकाम करणे या कामात वाकबगार होती. राणीच्या स्वयंसेविका व महिला सैनिक शहर व किल्ला

यांच्या सुरक्षिततेचे काम पाहत असे. इतकेच नाही तर ब्रिटिशांच्या बंदुकीच्या टापूतूनही त्या जीवाची पर्वा न करता युद्ध सामग्री घेऊन येत, सैनिकांच्या औषधपाण्याची व्यवस्था बघणे, त्यांच्यासाठी जेवण बनविणे, ही कामे त्या करीतच. त्याशिवाय पुरुषांच्या पलटणला सर्व प्रकारचा मदत करण्यात, त्या गुंतलेल्या असत. ना होती त्यांना आपल्या संसाराची पर्वा, ना स्वत:च्या जीवाची. राणीच्या पलटणीतील मोतीबाई नावाची महिला अत्यंत बुद्धिमान व मुसद्दी होती. लढाईचा आराखडा व सैन्यांच्या व्यूह रचणेत तिचाच सल्ला महत्त्वाचा मानला जात असे.

अझीझन नावाची कलांवतीण ब्रिटिशाच्या सैन्यातून बातम्या काढून आणण्याचे काम करीत असे. या सर्व स्त्रियांनी १८५७ साली या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण अर्पण केले. राणी लक्ष्मीबाईच्या नेतृत्वाखाली सर्वसाधारण स्त्रीवर्गाने कामगिरी केली, त्याचे श्रेय राणीच्या नेतृत्वाला आहेच; पण म्हणून तिच्या हाकेला ओ देऊन आलेल्या या स्त्रियांचे महत्त्व कमी होऊ शकत नाही. लक्ष्मीबाईप्रमाणेच एक बादशाहीण व काही राण्या आपले ऐशआरामाचे जीवन सोडून १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात सामील झाल्या होत्या. झीनत महल ही दिल्लीचा शेवटचा बादशाहा बहादुरशहा जफर यांची पत्नी होती. बेगम झीनतने कधी आपल्या लाल किल्याबाहेर डोकाहूनही पाहिले नव्हते. बादशाहीन या नात्याने बेगमने लोकांना अपले मतभेद मिटवून एक होण्याचे आवाहन केले. या आवाहनाचा लोकांवर खूप मोठा प्रभाव पडला.

१८५७ च्या युद्धाचे डावपेच लढविण्यात झीनत महलचा मोठा सहभाग होता, असे मानले जाते. बेगम हसरत महल ही अवधच्या नवाब वाजिदअली शहा यांची पत्नी . वाजिदअली शहा राजाच्या जीवनापेक्षा कलावंताचे जीवन अधिक पसंद करीत. परिणामी ब्रिटिशांनी त्यांचे राज्य खालसा केल्याबरोबर त्यांनी पाठविलेल्या ठिकाणी ते निघून गेले. बेगमने त्यांच्याबरोबर न जाता अवधवर ताबा ठेवून इंग्रजाबरोबर लढणे पसंत केले. राणी व्हिक्टोरीयाने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याला तिने सडेतोड उत्तर दिले. इंग्रजांशी तिने निकराने झुंज दिली. १८५९ पर्यंत ती इंग्रजांना भूलवत राहिली. तात्या टोपे व नानासाहेब पेशव्यांसारखे १८५७ मधील मातब्बर नेतेही अखेर तिच्याच आश्रयाला आले होते. एवढ्या मोठ्या साम्राज्याशी टक्कर देणे ही काही मामुली बात नव्हती.

या तिन्ही राण्यांनी व त्यांच्या सहकारी महिलांनी भारताच्या स्वांतत्र्याकरिता जे बलिदान केले ते कधी आपण विसरू शकत नाही. उत्तरेप्रमाणेच, दक्षिणेकडेही काही राजांनी स्वातंत्र्याकरिता प्राण अर्पण केले. मद्रास प्रांतातील शिवगंगा नावाच्या छोट्या संस्थानाचा राजा बटूकनाथ देवर यांची राणी वेलुंचीयार हिने ब्रिटिशांना आपल्या युद्ध कौशल्याने हैराण केले. ब्रिटिशांनी तिच्यापुढे हात टेकले व तिला हटविण्यासाठी डाकू कटू याची मदत घेतली. त्याच्या धमकावण्याला राणी वेलूने व तिच्या प्रजेने दाद दिली नाही. शेवटी या झगड्यात राणी हुतात्मा झाली. १८५७ च्या अंध:कार युगात या राणीने स्वातंत्र्याची मशाल तेवत ठेवली होती. राणी भीमाबाई ही इंदूरच्या होळकर घराण्यातील.

सन १८१७ मध्ये होळकरांचा इंग्रजांनी महिदपूर येथे मोठा पराभव केला. या लढाईचे नेतृत्व राणी भीमाबाईने स्वीकारले होते. पराभव झाला म्हणून खचून न जाता राणीने जंगलाचा आश्रय घेऊन परत आपल्या सैन्याची रचना केली. गनिमी काव्याने लढून तिने इंग्रजांना जेरीस आणले. दोन्ही बाजूंचे खूप नुकसान झाले. कंपनी कमांडर सर मालकम साहेबाला राणीचा पत्ता लागला. राणीला त्याने घेरले. त्या घेराव्यातून राणी घोडा अडवत बाहेर पडली. काय झाले हे ब्रिटिश फौजेला कळण्यापूर्वीच राणी वायुवेगाने निघूनही गेली. ती इंग्रजांच्या हाती लागली नाही ते नाहीच. भीमाबाईंचे पुढे काय झाले, हे कळले नाही.



कर्नाटकात कित्तूर नावाचे एक लहान संस्थान होते. या संस्थानातील अलोट संपत्तीची माहिती मिळाल्यामुळे या संस्थानातील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटले त्यांनी संपत्ती मिळवण्यासाठी कित्तूरवर हल्ला केला. या संस्थानाची राणी चेन्नमा हिने इंग्रजांचा धुव्वा उडविला. त्यांचा सेनापती थॅकरे युद्धात मारला गेला. चेनम्मा राणीची शौर्यगाथा कानडी साहित्यातील लोकगीतात वर्णन केली आहे.

सन १८५७ मध्ये महाराष्ट्रातील नरगुन्ह नावाच्या एका छोट्या संस्थानातील राण्यांनीही ब्रिटिश राज्याच्या विरोधात शस्त्र उभारलेले व त्या शहिद झाल्या. उत्तरप्रदेशात एक तुलसीपूर नावाचे संस्थान आहे. तुलसीपूरची राणी ईश्वरकुमारी हिला १८५७ मध्ये ब्रिटिशांच्या विरुद्ध युद्ध करणे भाग पडले. तुलसीपूरचा राजा दिग्रजसिंग इंग्रजांच्या कैदेत होता, तो तिथेच मरण पावला. ईश्वरकुमारीने धीर सोडला नाही. १८५९ मध्ये इंग्रज असिस्टंट म्हणतो की, या राणीला शर्थीचा प्रयत्न केल्याशिवाय जिंकताच येणार नाही. एकटीने लढणे अगदीच कठीण झाल्यावर राणी ईश्वरकुमारी बेगम हसरतला जाऊन मिळाली.

१९ व्या शतकातील भारताच्या या सुकन्यांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान केले. त्यांची कथा खरोखरच प्रेरणादायक आहे. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध चिरडून टाकण्यास इंग्रजांनी भले-बुरे सर्व उपाय अंमलात आणले. खूप अन्याय, अत्याचार व हिंसा केली. लाखोंना झाडावर टांगून फाशी दिली. भयंकर घबराट निर्माण केली. १८८५ मध्ये काँग्रसची स्थापना होईपर्यंत, अशी अवस्था आपल्या देशात होती. काँग्रेसच्या स्थापनेनंतर ५६ वर्षातच काँग्रेसच्या अधिवेशनाला महिला जाऊ लागल्या. पंडिता रमाबाई यांच्या नेतृत्वाखाली १९९२ साली बंगाल व महाराष्ट्र मिळून ८-१० महिला पहिल्या प्रथम काँग्रेसच्या अधिवेशनाला गेल्या. घराच्या बाहेरील सार्वजनिक कामात भारतीय महिलांचे पहिले पाऊल पडले. यानंतर दरवर्षी काही महिला आपला पती अगर पित्याबरोबर काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाला हजर राहू लागल्या, परंतु या स्त्रिया समाजाच्या निंदेच्या भयाने अधिवेशनात भाग घेत नसत. तुम्ही घ्या ना भाग; तुम्ही बोलाना असा आग्रहही त्यांना कुणी करत नसे.

श्रीमती कादंबिनी गांगुली हिने प्रथम व्यासपीठावर जाऊन बोलण्याचे धाडस केले. महिलांसाठी व्यासपीठाचा दरवाजा तिने उघडून घेतला. आपल्या भाषणात तिने महिलांना काँग्रेसच्या कामकाजात भाग घ्यायचा अधिकार मिळालाच पाहिजे या मुद्यावर जोर दिला. ''महिला म्हणजे काही कटपुथल्या बाहुल्या नाहीत. पुढच्या वर्षीच्या अधिवेशनात तुम्ही बायकांचे पुतळे जागोजागी उभे करा. आम्ही आता इथे पुतळे बनविण्यासाठी येणार नाही.'' असे तिने जोरात ठणकावले. कादंबिनीबाईच्या भाषणाचा काँग्रेस कार्यकर्त्यांवर खूप प्रभाव पडला. स्त्रियांची अबोल भावना बोलकी झाली. हळुहळू स्त्रिया काँग्रेसच्या अधिवेशनात आपले विचार मांडू लागल्या. या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकातील स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांचा सहभाग कसा होता त्याची कथा आपण पाहू.

महात्मा गांधींच्या भारतातील आगमनापूर्वीही महाराष्ट्रात नाशिक शहरात स्वदेशीची शिकवण देणारी एक महिला सभा होती. स्वा. वीर सावरकर यांची वहिनी येसू सावरकर या सभेच्या संस्थापिका. सावरकर बंधू अंदमानच्या कालकोठडीत शिक्षा भोगत होते. 'अभिनव भारत' या त्यांनी स्थापन केलेल्या संघटनेतील बहुतेक कार्यकर्ते तुरुगांत होते. त्यांच्या बायकांना बंडखोराच्या बायका म्हणून पोलिसांकडून त्रास होई. सासरची व माहेरची माणसेही सरकारी भयामुळे त्यांना जवळ करीत नव्हती. येसू वहिनींनी या स्त्रियांची ''आत्मनिष्ठ युवती संघ''नावाची संघटना स्थापली. या स्त्रियांनी स्वदेशीचे व्रत घेतले व त्याचा प्रसार केला. काचेच्या

बांगड्यांचा चुडा भरणे हे सुवासिनीचे प्रमुख लक्षण, आपल्या देशात पूर्वी काच बनत नसे.

बांगड्या विदेशी असल्यामुळे सुवासिनीचे हे आवश्यक लक्षण असूनही त्यांनी हातात काचेची बांगडी घालायचे सोडले. साखर परदेशी म्हणून तिही सोडली. मराठीतील त्या वेळेचे प्रसिद्ध कवी विनायक यांच्या देशभक्तीपर कवितांवर सरकारने बंदी घातली होती. स्वाभिमानी युवतींनी त्यांच्या कविता पाठ करून त्यांचा तोंडी प्रसार करून त्या लोकप्रिय करण्याचे फार मोठे देशकार्य केले. युवती संघातील स्त्रिया मध्यम व कनिष्ठ वर्गातील होत्या. सरकारी त्रासाने गांजल्या होत्या. तरीही त्यांनी स्वदेशी जागरणाचे आपले काम चालू ठेवले.

बेगम हजरत महल, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याची सूत्रे आपल्या हातात घेतली. याचाच परिणाम या स्वातंत्र्यलढ्यात हिंदु-मुस्लीम बांधवाचे ऐक्य झाल्याचे दिसून येते. सत्याग्रह लढ्यात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता. परदेशी मालाच्या दुकानांसमोर व दारूच्या दुकानांसमोर निदर्शने करण्यात त्या पुढे होत्या. शेकडो स्त्रियांनी तुरुंगवास पत्करला. पोलिसांच्या अत्याचारांना त्या धैर्याने सामोरे गेल्या. कस्तुरबा गांधी, कमलादेवी चटोपाध्याय, अवंतीकाबाई गोखले, लीलावती मुन्शी, हंसाबेन मेहता अशा कितीतरी स्त्रियांनी सत्याग्रहात पुढाकार घेतला होता.

विसाव्या शतकात सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा सहभाग वाढू लागला. राष्ट्रीय चळवळीत व क्रांतिकार्यात स्त्रियांचा मोलाचा सहभाग होता. १९३५ च्या कायद्यानंतर प्रांतिक मंत्रिमंडळामध्येही स्त्रियांचा समावेश झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय संविधानातून स्त्री-पुरुष समतेचे तत्त्व स्पष्टपणे नमूद करण्यात आले.

अशाप्रकारे भारतीय स्वातंत्र्यसंग्रामामध्ये स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे व स्फूर्तिदायी ठरले आहे.

ऋण या जन्माचं...

■ **गणेश तिवाडे** बी. ए. भाग २

दोन पाय माझ्या ताईचे
घरभर मला फिरवणारे
गणुदादा म्हणत
असंगत मिरवणारे...
दोन हात माझ्या भावाचे
चालायला शिकविणारे
मार्गातील अडथळे सारून
नवी वाट दाखवणारे
दोन खांदे बाबांचे
हसत खेळत जिथे झालो मोठा
ज्यावर बसून मी पाहल्या
आयुष्याच्या नागमोळी वाटा
दोन शब्द मैत्रिणीचे
मन शांत करणारे
गोंधळ गर्दित असतानाही
एकांतात गाठणारे
दोन शब्द मित्राचे
आधार देणारे खात्रीचे
आठवन बनून साठलेले
एकच हृदय माझ्या आईचे
अंत:करणातल्या मायेचे
सगळे काही समावणारे
आसमंतात न मावनारे...
एवढेच ऋण या जन्माचे कधीही न फिटणारे

भारतीय स्वातंत्र्यसेनानी यांच्या जीवनावरील कविता

■ **आसावरी गुलाब लोणारे** बी. ए. भाग ३

बाळ गंगाधर टिळक
(१८५६-१९२०)

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे
तो मी घेतल्याशिवाय राहणार नाही'

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे
तो मी घेतल्याशिवाय राहणार नाही
सिंह गर्जना ज्यांनी केली !
ज्यांच्या या गर्जनेनी ब्रिटिश सरकार
पूर्ण हादरुन गेली !!
ब्रिटिश सरकारची जुलूम अन् दडपशाही
ज्यांनी केली नाही मान्य !
ते भारतीय असंतोषाचे जनक
थोर देशभक्त लोकमान्य !!
समाजाची अन् लोककल्याणाची
होती त्यांना तळमळ !
सुरू केली त्यांनी लोकजागृतीची
व्यापक चळवळ !!
त्यासाठी मराठा व केसरीचा अंक
केला सुरू !
सरकारचे डोके ठिकाणावर आहे का ?
हा प्रश्न सरकारला विचारला !!
सरकारच्या अन्यायाचे जनतेसमोर
वाचले पाढे !
न्याय मिळविण्यासाठी दिले
अन्यायी सरकारशी लढे !!
राजद्रोहासारखे आरोप अंगावर
घेऊन हिमतीने लढले !
तुरूंगवास भोगला परी स्वातंत्र्याचे
रणांगण नाही सोडले !!
स्वातंत्र्यासाठी दु:ख सोसले
एक ना अनेक !
नाव त्याचे बाळ गंगाधर टिळक
बाळ गंगाधर टिळक !!

सरदार वल्लभभाई पटेल
(१८७५ –१९५०)

'कर मत दो'

लोहपुरुष की ऐसी छबी
ना देखी, ना सोची कभी
आवाज से सिंहसी दहाड थी
हृदय में कोमलता की पुकार थी
एकता का स्वरूप जो इसने रचा
देश का मानचित्र पल भरमे बदला
गरीबो का सरदार था वो
दुश्मनो के लिए लोहा था वो
आंधी की तरह बहता गया
आंधी की तरह बहता गया
ज्वालामुखी सा धकधकता गया
बनकर गांधी का अहिंसा का शस्त्र
महकता गया विश्व में जैसे कोई ब्रम्हास्त्र
इतिहास के गलियारे खोजते है जिन्हे
ऐसे सरदार पटेल अब ना मिलते विश्व में

सुभाष चंद्र बोस
(१८९७–१९४५)

'तुम मुझे खुन दो,
मै तुम्हे आजादी दुंगा'

माँ को जंजीरों में देखकर
बेटा कैसे सो सकता है।
दुनिया वाले बडे अदब से
जिन्हे नेता जी कहते है।।
अपना तन–मन, धन–जीवन
जिसने भारत माँ को सौंप दिया ।
आजादी का बिगुल बजाकर
अंग्रेजो को सौप दिया ।।
आजादी के लिए जिसने
आजाद हिंद फौज बनाया था ।
थोडा–थोडा करके
पचास हजार को साथ मे लाया था ।।
हो स्वाधीनता से
प्रेम जिसे, कब हाथों पर हाथ धरे रहते है।
दुनिया वाले बडे अदब से
जिन्हे नेता जी कहते है।।

लाल बहादुर शास्त्री

(१९०४–१९६६)

'जय जवान, जय किसान'

२ अक्तुबर को जन्म हुआ था
नाम लाल बहादुर शास्त्री था ।
कद में भले ही छोटे थे वो
पर गुणों में बहुत महान थे ।
साधा जीवन उच्च विचार
यही उनकी पहचान थी ।
गांधीवादी विचारधारा के
वो सच्चे अनुगामी थे ।
आजादी की लढाई के वो
सक्रीय योगदानी थे ।
अपने श्रेष्ठ कर्मो के कारण
वो भारत की शान थे ।
उनकी देशभक्ती और कर्मनिष्ठा पर
परे देश को अभिमान है।

भगत सिंह

(१९०७–१९३१)

'इन्कलाब जिंदाबाद'

भारत देश का था वो दुलारा,
झुके उसके आगे शीश हमारा ।
हँस कर झूल गया फाँसी पर,
वो है पुरे हिंदुस्तान को प्यारा ।
किया काम बेशक हिंसा का तुमने,
केवल यही है दोष तुम्हारा ।
देश के लिए हो गए कुर्बान,
और बडा दिया गौरव हमारा ।
तेरी देशभक्ति पर सब है न्यौछावर,
तेरा साहस है सबसे न्यारा ।
भारत देश का था वो दुलारा,
झुके उसके आगे शीश हमारा ।



चंद्रशेखर आजाद
(१९०६–१९३१)

'आजाद ही रहे है, आजाद ही रहेंगे'

क्रांती की मशाल लिए
वो निकला था घर से
बांध के माँ भारती की
चुनर अपने सर पें ।
यही था कृपान उसका
यही उसकी ढाल था
दिल में शेष लिए
वो भारत का लाल था ।
ना खबर थी शाम की
ना फिकर थी यारों की
भारत के इस लाल ने
नींद उडा दी गोरों की ।
गुलामी में जन्म लिया
ना गुलाम मरुँगा
आजाद था, आजाद हुँ,
आजाद रहुँगा ।
थी प्रतिज्ञा अडिंग उसकी
पत्थर की लकीर थी
अंग्रेजी हुकूमत की छाती में
चुभती थी तीर सी ।
क्रांतिकारी दल बनाया
कांकोरी को अंजाम दिया
गोरों की साँसो को
बन्दुक से विराम दिया ।
छलनि था शरीर उसका
सीने पर घाव था
गोलियों की होलीयां थी,
पर मूंछों पर ताव था ।
कई बार भेष बदले
बदले उसने नाम कई
माँ भारती की स्वाधीनता हेतु
किये बडे काम कई ।
बल से घेरा शत्रु ने जब
भारत माँ को याद किया
अकेला भिडा सेना से वो
दुश्मन से दो हाथ किया ।
अकेले अंग्रेजी सेना को
दातों चने चबवा दिए
अंतिम गोली रही जब शेष
तब स्वयं अपने प्राण लिए ।
जीते जी छू ना सके
वो माटी, के लाल को
शहीद का लहु देख
रोना आये काल को ।
आओ मिलकर याद करे
हम शेखर महान को
चंद्रशेखर नाम जिसका
भारत के आजाद को ।

भारतीय स्वातंत्र्यसेनानी व आंदोलने

■ **आदित्य बदकवार** बी. ए. भाग ३

''जमाने भर से मिलते है आशिक कई
मगर वतन से खुबसुरत कोई सनम नही
नोटो मे लिपट कर, सोने मे सिमटकर मरे है कई
मगर तिरंगे से खुबसुरत कोई दफन नही'

भारताच्या स्वातंत्र्याचा विचार केला तर विविध थोरपुरुषांनी,विरांगणांनी, स्वांतत्र्यसैनिकांनी म्हणजेच देशभक्तांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा स्वातंत्र्याच्या इहितहासात सुवर्णक्षरांनी कोरलेला दिसून येतो. यांनी आपल्या शरीरातील रक्ताच्या शेवटच्या क्षणापर्यंत देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती दिली. त्यांना त्या परिस्थितीमध्ये सुद्धा स्वतंत्र असलेला देश आणि लहरत असलेला तिरंगा हेच त्यांचे स्वप्न आणि सर्वस्व होते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजेच आपल्या स्वातंत्र्याचा ७५ वा वर्षे हा वर्ष आपल्या सर्वांचा उत्सवाचा, आनंदाचा आहे. याला शासनाची सहमती प्राप्त झालेली आहे. तर मग हे वर्ष स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजेच स्वातंत्र्याप्रती दिवाळी, दसऱ्या सारखा साजरा करावा.

''कण कण करोनी कोटी केले.
कण कण न खर्चिला स्व:हितासाठी
पण पण करुनी कण कण झिजले
महात्मा गांधी जनतेसाठी लढले..''

महात्मा गांधी यांनी भारतीय राजनीती संपूर्ण बदलून टाकली. सत्याग्रह व अहिंसा या शस्त्राचा उपयोग करणारे म्हणून त्यांना ओळखले जायचे. या शस्त्राच्या आधारेच त्यांनी अनेक सत्याग्रह, आंदोलने यशस्वी केले या आंदोलनापैकीच एक आंदोलन ते म्हणजेच चले जाव आंदोलन/भारत छोडो, चळवळ तर



स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव १४ जुलै १९४२ ला संमत करण्यात आला व ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे गवालिया टँक मैदानावर राष्ट्रीय सभेचे अधिवेशन सुरू झाले यावेळी गांधीजींनी आपल्या भाषणात देशाच्या स्वातंत्र्यासाठी अहिंसक लढ्यात सामिल होण्याचे आवाहन देशवासीयांना केले. त्यांनी जनतेला 'करा किंवा मरा' हा संदेश दिला व त्यांनी ब्रिटिशांना 'चालते व्हावे' असे ठणकावून सांगितले. नतंर ८ ऑगस्ट १९४२ ला 'छोडो भारत' चा ठराव अधिवेशनात मंजूर करण्यात आला.

महाराष्ट्रात 'चले जाव' चळवळ मोठया प्रमाणात झाली. चिमुर, आष्टी, महाड इ. ठिकाणी आंदोलने झाली. प्रत्यक्ष जनतेने न डगमगता स्वत:च चले जाव आंदोलनाची दिशा स्पष्ट केले. नंतर चले जाव चळवळीस प्रत्यक्ष भूमिगत आंदोलनाचे स्वरूप लाभले या चळवळीचा शेवट १९४७ च्या स्वातंत्र्यप्राप्तीने झाला.

लढाऊ व वादळी व्यक्तिमत्त्व असलेले क्रांतिकारक म्हणून प्रख्यात असलेले नेताजी सुभाषचंद्र बोस मनापासून देशावर प्रेम करणे, देश आपलाच मानणे, देशाचा मान तो माझा मान देशाचा अपमान तोच माझा अपमान असे त्यांचे मत, विचार होते. यांना अहिसेंचा मार्ग कधीच मान्य नव्हता. अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळेल यावर त्यांचा विश्वास नव्हता. स्वातंत्र्य दिले जात नाही तर ते घेतले जाते. त्याच्यासाठी किंमत द्यावी लागते, आणि ती किंमत म्हणजे रक्त! असे नेताजीचे विचार होते. त्यांनी १९३९ मध्ये 'फारवर्ड ब्लॅकची' स्थापना केली. व ब्रिटिश पार्लमेंटने १८ जुलै १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा फायदा समंत केला. २१ ऑक्टोबर १९४३ ला सिंगापूर येथे आझाद हिंद सेनेचे 'हंगामी सरकार स्थापन केले' नेताजींनी जनतेला 'तुम मुझे खुन दो, मै तुम्हे आजादी दुँगा' असे आवाहन केले. व 'चलो दिल्ली' हा नारा जनतेला दिला. ८ ऑगस्ट १९४५ ला अपघाताने त्यांचा निधन झाला व आझाद हिंद सेनेचे पर्व संपुष्टात आले.

''कर सको तो साथियो एक आयाम
पैदा करो
कर सको तो साथियो अपने आप में
हिमत पैदा करो

या तत्वाचे पालन करणारे देशभक्त भगतसिंग होते. भगतसिंगाने मार्च १९२६ मध्ये नवजवान भारत सभा स्थापन केली व जवानांना प्रेरित केले. डिसेंबर १९२८ मध्ये भगतसिंग आणि त्यांचे सहकारी यांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी ब्रिटिश पोलीस अधिकारी जॉन सॉडर्सला ठार केले.

१९२८ मध्ये भगतसिंगानी व सहकाऱ्यासोबत दिल्ली येथे 'हिंदुस्तान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन संघटना स्थापन केली. ब्रिटिशांच्या शोषणातून भारतीयांची मुक्तता करणे, हे या संघटनेचे उदिष्ट होते. ८ एप्रिल १९२९ या दिवशी दडपशाहीचे 'पब्लिक सेफ्टी बील' सरकारने मंजूर केले. याचा निषेध करण्यासाठी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी कायदेमंडळात बाँम्बस्फोट घडवून आणले. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांनी २३ मार्च १९३१ ला कायदेमंडळात बाँम्ब फेकले म्हणून नाही; तर सँडर्सच्या हत्येच्या आरोपाखाली त्यांना फाशी देण्यात आली.

''हिंदू च्या हृदयात मुस्लिम आनंदाने राहतील
आणि मुस्लिमांच्या दु:खात हिंदूचे डोळे पाहतील
स्त्रियांना सन्मान आणि कायद्याचे राज्य असणारा
जागतिक महासत्ता बनलेला स्वतंत्र भारत
हेच डॉ. बाबासाहेबाचे स्वप्न होते ''

डॉ. आंबेडकर हे भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रचारामध्ये व चर्चामध्ये सामील झाले. वृत्तपत्रे प्रकशित केली. दलितांसाठी राजकीय हक्कांचा व सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. भ्रष्टाचार, अत्याचार अन्यायास त्यांचा विरोध होता.

डॉ. आंबेडकरांनी भारताला अनमोल अशी देणगी दिली ते म्हणजेच भारतीय राज्यघटना. या राज्यघटनेमध्ये नागरिकांना मूलभूत हक्क व अधिकारी दिले आहेत. भारतीय जनता विषमता, आदर, मानसन्मान यांना विसरून चालत असेल तर या शहिदांनी जे प्राणपणाला लावून स्वातंत्र्य मिळवून दिले त्याचा काय फायदा? आपल्या स्वातंत्र्याचा, राष्ट्रीय ध्वजाचा आणि राज्यघटनेचा सन्मान यालाच खरा देशभक्त म्हटल्या जाईल.

शेवटी म्हणेन,

''वतन वालो वतन को ना बेचना
ये धरती ये अंबर ना बेचना
शहिदो ने जान दि है उसके वास्ते
आज उनके कफन ना बेचना ''

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव केवळ 'इव्हेंट' ठरू नये!

■ **प्रेमकुमार बोके** बी. एस्सी. भाग ३

यावर्षी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजेच ७५ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यासाठी जोरदार तयारी सुरू आहे. तसे आदेशही सरकारी पातळीवरुन पारित झाले आहेत. त्यामुळे सरकारी यंत्रणा कामाला लागली असून शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे व घरांवर तिरंगा झेंडा लावून स्वातंत्र्योत्सव नेहमीपेक्षा जोरात साजरा करण्याचे नियोजन आहे. स्वातंत्र्य मिळणे हा एक आनंदाचा क्षण होता आणि त्यासाठी लाखो लोकांचे बलिदान, संघर्ष, त्याग, समर्पणातून देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यात आले. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद होणे आणि स्वातंत्र्यसेनानींच्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे देशातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. दरवर्षी १५ ऑगस्टला आपण सर्वजण त्या सुवर्णक्षणाची आठवण करतच असतो. परंतु ७५ वर्षे हा एक मोठा कालखंड आहे. त्यामुळे आपला देश स्वतंत्र झाला तो दिवस विशेष रूपाने साजरा करणे व आमच्या स्वातंत्र्यवीरांचे स्मरण करणे, ही आमची जबाबदारी आहे. प्रत्येकाला देशाचे स्वातंत्र्य, स्वातंत्र्य संग्राम सैनिक व स्वातंत्र्य संग्रामाचे महत्त्व कळावे म्हणून स्वातंत्र्य दिन धुमधडाक्यात साजरा झालाच पाहिजे.

परंतु हे सर्व करीत असतांना या ७५ वर्षात आम्ही काय कमावले आणि काय गमावले याचाही लेखाजोखा मांडला पाहिजे. या ७५ वर्षात देशाने विविध क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केली. ज्या देशाला इंग्रजांनी कंगाल करून ठेवले होते, त्या देशाला पुन्हा नव्याने उभे करणे इतके सोपे काम नव्हते. त्यामुळे आज देशात ज्या पायाभूत, मूलभूत सुविधा दिसतात त्यात तेव्हाच्या राज्यकर्त्यांची दूरदृष्टी, आत्मीयता, कष्ट, समर्पण, देशभक्ती या सर्व गोष्टींमुळे हे कठीण कार्य शक्य झाले.

ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, अवकाश, कृषी, वीज, रस्ते, रेल्वे, धरणे, उद्योग, दूरसंचार, स्वास्थ्य, बहुउद्देशीय संस्था यासारख्या अनेक महत्त्वाच्या क्षेत्रात देशाने जी नेत्रदीपक प्रगती केली ती सर्वांच्या संघटीत श्रमाचे आणि देशाविषयीच्या प्रेमाचे फल आहे. त्यामुळे ७५ वर्षात देशात काहीच झाले नाही असे म्हणविणाऱ्यांनी आज आपण ज्या सुखसुविधांचा आस्वाद घेत आहोत त्या कोठून आल्यात याचाही विचार करणे गरजेचे आहे. राजकीय विरोध समजू शकतो, परंतु केवळ विरोधासाठी विरोध करून देशाने केलेली प्रगतीच नाकारणे हा केवळ तेव्हाच्या राजकर्त्यांचाच अपमान नाही तर हे सर्व निर्माण करण्यासाठी ज्या शेतकरी, कष्टकरी, कामगार, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, डॉक्टर्स, अभियंते, शिक्षक, समाजसेवी कार्यकर्ते यांनी जी मेहनत घेतली त्या सर्वांचा घोर अपमान आहे. त्यामुळे अमृत महोत्सव साजरा करतांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ज्यांनी संघर्ष केला त्यांच्याप्रमाणेच स्वातंत्र्यानंतर देशाला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी ज्यांनी अपार कष्ट घेतले त्यांनाही विसरता येणार नाही. त्या सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे या सर्व सुविधांचे लाभार्थी

म्हणून आमचे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

या सर्व सकारात्मक बाबी देशात घडलेल्या असतांना आणि देश सर्वात समृद्ध आणि शक्तिमान लोकशाही म्हणून जगात नावलौकिक मिळवित असतांना मागील काही वर्षापासून मात्र देशात अस्वस्थता आहे. सर्वधर्मसमभावाची चौकट असलेली लोकशाही एका विशिष्ट चाकोरीत बंदिस्त करण्याचे मनसुबे देशाला मागे नेणारे आहे. दुसऱ्यांच्या कामाचे श्रेय नाकारणे व स्वतः न केलेल्याही कामाचे श्रेय घेणे ही मोठी कृतघ्नता आहे. जर ७५ वर्षात देशात काहीच नवनिर्मिती झाली नसती तर आज ज्या सरकारी संस्था उद्योगपतींच्या घशात घालणे सुरू आहे त्या कोणी उभारल्या आहे? देशाचा कणा असलेल्या अत्यंत महत्त्वाच्या संस्थांचे जर खाजगीकरण होत असेल आणि सरकारची मालकी व अधिकार जर संपुष्टात येत असतील तर सरकार नावाची यंत्रणा मग कशासाठी आहे? देशाचा अमृत महोत्सव साजरा करणे म्हणजे फक्त प्रत्येक घरावर तिरंगा झेंडा लावणे आणि जयजयकार करणे एवढेच अपेक्षित असेल तर मग स्वातंत्र्याचा खरा अर्थच आम्हाला कळलेला नाही. घरावर झेंडे लावण्याआधी त्या घरातील चूल कशी पेटते, पेटते की नाही याचाही शोध घेतला पाहिजे. त्या घरातील दिव्यात आणि भाजीत तेल आहे की नाही हे स्वातंत्र्याचा दीपोत्सव साजरा करण्याआधी तपासले पाहिजे. तिरंगा अभिमानाने हातात घेवून मिरविण्यासाठी अशी कोणती मोठी अभिमानास्पद कामे देशात सध्या झालेली आहे? लोकांच्या जगण्याचा प्रश्न अतिशय बिकट झालेला असतांना कोट्यावधी रुपयांचे तिरंगे फडकवून स्वतःची पाठ स्वतःच थोपटून घेण्यात कोणता पुरुषार्थ आहे ?

लोकांना केवळ भावनेच्या आहारी नेवून जनतेच्या मुख्य प्रश्नांना बगल देण्याचा हा कार्यक्रम म्हणजे समस्त स्वातंत्र्यवीरांचा घोर अपमान आहे. ज्यासाठी त्यांनी आपले रक्त सांडले,त्या रक्तासोबत केलेली ही प्रतारणा आहे. शाळेत जाण्यासाठी एसटीच्या पासचे पैसे भरू शकत नाही म्हणून जर एखादी विद्यार्थीनी आत्महत्या करीत असेल तर तो देशातील सगळ्या राजकीय पुढाऱ्यांचा पराभव आहे. हजारदा उंबरठे झिजवूनही आपल्या जमिनीचा मोबदला मिळत नाही म्हणून ८० वर्षाचे शेतकरी धर्मा पाटील जर मंत्रालयात विष प्राशन करून आत्महत्या करीत असतील तर सगळे राजकीय प्रतिनिधी निगरगट्ट झाले आहेत आणि आजच्या राजकीय नेत्यांपेक्षा इंग्रज बरे होते असे म्हणण्याची वेळ आली आहे. बडे उद्योगपती सरकारचे अब्जावधी रुपये बुडवून परदेशात पळून जातात आणि इकडे ५० हजाराच्या कर्जासाठी मात्र शेतकऱ्यांना अटक वारंट येतात. खरेच तुम्हाला उजळ माथ्याने भारताचा तिरंगा ध्वज फडकविण्याचा अधिकार तरी आहे का ? त्यामुळे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतांना अमृत कोण पित आहे आणि विष पिण्यासाठी कोणाला प्रवृत्त केले जात आहे यावर चिंतन होत नसेल तर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हा केवळ एक इव्हेंट ठरणार आहे. तसेही आता आपल्या देशात असे इव्हेंट साजरी करण्याची नवीन पध्दत सुरू झाली असून त्या इव्हेंटच्या झगमगाटात सर्वसामान्य माणसाच्या जगण्याचे प्रश्न लुप्त झाले आहेत. त्यामुळे हा अमृत महोत्सव पुन्हा एक इव्हेंट न ठरता तो स्वातंत्र्यसंग्राम सेनानींच्या स्वप्नातील आधुनिक भारत उभारणीसाठीचा एक सकारात्मक आणि आशादायी कार्यक्रम ठरावा हीच अपेक्षा !

जय भारत

■ **रोहिणी भोयर** बी. ए. भाग ३

जय भारत देशा, तुझ्या चरणी,
कोटी कोटी नमन ।
नाम तुझे विश्वात साऱ्या,
नित्य नित्य हे उच्च वसो ।।
ही जन्म भूमी ज्या साऱ्या रामकृष्णाची,
त्या धर्म सत्याचे दुत आम्ही।
अन्याय चिरडल्या ज्या राज्यांनी,
त्या शंभुशिवाचे सूत आम्ही ।।
स्वातंत्र्य मिळालं ज्या मुळे,
त्या शूरवीरांना स्मरू आम्ही।
देशभक्तीची ही अविरत गंगा,
जना जनात ठासून वसो
नाम तुझे विश्वात साऱ्या,
नित्य नित्य हे उच्च वसो ।।
जगता मध्ये शांती ज्योत ही
लख-लखती सदैव दिसो
नाम तुझे विश्वात साऱ्या,
नित्य हे उच्च वसो ।।
जय भारत, जय भारत,
जय भारत देशा...

अजुनही कानात माझ्या

■ **कल्याणी कोरेटी** बी. एस्सी. भाग १

अजूनही कानात माझ्या गुंजताहेत
वंदे मातरमचे नारे
हसत हसत अन् चढत होते फासावरती सारे
त्यागला होता संसार
देशच होता प्राण
त्यागले होते तारुण्य
मिळविण्या स्वातंत्र्य
अजूनही आठवताहेत मला ते रस्ते
सांडले होते त्यांच्यावर रक्तच रक्त नुसते
पडले होते देहही
पडले होते इरादे
मात्र आवाज होता कानी
विसरु नका रे वादे
अजुनही आठवताहेत मला ते डोळे
ओकत होते फक्त आगीचे गोळे
हृदय नव्हतेच ते
झाले होते दगड
पाहत होते वाट
तुडविण्या फिरंगी रग्गड
आज तेच आहेत रस्ते, तेच आहेत डोळे
वाट बघताहेत अजुन एका उठावाची
मग लागतील तसेच नारे
पुन्हा उठतील पेटूनी सारे
हाती घेऊनी मशाली
लढण्या मानवते विरुद्ध ।।
अजूनही कानात माझ्या गुंजताहेत
वंदे मातरम्चे नारे
हसत हसत अन् चढत होते
फासावरती सारे ।।

भारत के सैनिक

■ **सायली सयाम** बी. एस्सी. भाग १

देश की रक्षा करने में
जो न सोते है दिन रात
वह सरहद के पहरेदार
न मानते है कभी हार
देश के लिए अपना घर छोड
वीरान जगह पर रहते है
कडी धूप हो या ठंड
हर मुश्किल को सहते है।
दुश्मनो से लढकर
आगे हमेशा बढते है
तुफानो पे जीत पाकर
कभी नही डरते है।

सरदार वल्लभभाई पटेल यांचे जीवनकार्य

■ **विशाखा भाईचंद लेनगुरे** बी. ए. भाग १

'' भारताला तोडण्यासाठी इंग्रज,
निजाम आणि जिन्ना रडला होता...
कारण माझा एकटा राजा
लोहपुरुष सरदार पटेल नडला होता...''

भारतीय एकता व अखंडतेचे प्रतीक आधुनिक भारताचे निर्माते महान क्रांतिकारक, एक राजनेता थोर स्वतंत्रसेनानी व भारताचे पहिले उपपंतप्रधान राष्ट्रीय एक्याचा महामेरू यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हा जगातील उंच पुतळा उभारला आहे असे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल...

उदा. ज्या प्रमाणे दुष्टांचा नाश करण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी बंदिवासात असलेल्या वासुदेव आणि देवकीच्या पोटी जन्म घेऊन दुष्टांचा नाश केला. व बंदिखान्यात असलेल्या आपल्या माता पित्यांची सुटका केली त्याचप्रकारे दुष्ट ब्रिटिशांच्या तावडीतून व गुलामगिरीच्या साखळदंडानी बांधलेल्या भारत मातेला ब्रिटिशांच्या बंदिवासातून सुटका करण्यासाठी अनेक तेजस्वी पुत्रांनी जन्म घेतला व भारतमातेची बंदिवासातून सुटका करण्यासाठी प्राणपणाला लावले आणि तिची दास्यातून सुटका केली. अशाच एका तेजस्वी पुत्राचे नाव 'सरदार वल्लभभाई पटेल' होय. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वातंत्र्याचे संरक्षण संवर्धन करण्यासाठी आपले जीवन खर्ची घातले.

''भारत की मिट्टी में
कुछ तो खास है
जो हमेशा से
महापुरुषो का जन्म स्थान
और निवास स्थान बना रहा है''।।

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी लेवा पटेल एका शेतकरी कुटुंबातील समाजामध्ये त्यांच्या मामाच्या नडियाद (गुजरात) येथील घरी झाला. त्यांचे पूर्ण नाव वल्लभभाई झवेरभाई पटेल असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव झवेरभाई हे खेडा जिल्ह्याच्या करमसद गावचे रहिवासी होते. तसेच वल्लभभाई पटेल यांच्या आईचे नाव लाउबा होते. वल्लभभाईंना तीन मोठे भाऊ नरसीभाई, विठ्ठलभाई व सोमाभाई आणि एक बहीण जीचे नाव दहीबा पटेल होते.

पुर्वीच्या काळी बालविवाहाची प्रथा असल्याने वल्लभभाई पटेल यांचा विवाह वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी १८९१ साली झावेरबा नावाच्या कन्येशी करून देण्यात आला. त्यांच्या पासून दह्याबाई आणि मणिबेन पटेल अशी दोन अपत्ये झालीत. वल्लभभाईची पत्नी झावेरबा कॅन्सर ने पीडित असल्याने त्यांचा आणि वल्लभभाईचा संसार दीर्घकाळ टिकला नाही. १९०९ साली त्यांच्या पत्नीचे निधन झाले.

वल्लभाई कोर्टात काम करत असतांना त्यांच्या पत्नीचे निधन झाल्याची बातमी मिळाली तरी देखील त्यांनी मागे न हटता आपले कामकाज पूर्ण केले. कोर्टातील खटला जिंकले आणि त्यानंतर आपल्या पत्नीच्या मृत्यूची बातमी त्यांनी सर्वांना दिली.

''मुश्किल समय मे कायर
लोग बहाना ढुंढते है
लेकीन वीर व्यक्ती
रास्ता खोजते है।''

पुढे आपले प्रारंभिक जीवन गुजराती मिडीयम स्कुल मधून पूर्ण केले, पुढे त्यांनी इंग्लिश मिडीयम शाळेत प्रवेश घेतला. आपले शिक्षण पूर्ण करण्याकरिता त्यांना विलंब लागला. १८९७ ला वयाच्या २२ व्या वर्षी त्यांनी १० वी ची परीक्षा उत्तीर्ण केली. वल्लभभाई यांच्या घरची परिस्थती फार हलाखीची असल्याने महाविद्यालयात न जाता घरी राहूनच पुस्तक उधार घेऊन शिक्षण घेतले. शिवाय जिल्हाधिकारी होण्याकरिता दिल्या जाणाऱ्या परीक्षेचा अभ्यास सुद्धा त्यांनी घरूनच केला. अभ्यासात ते एवढे हुशार होते की, या परीक्षेत त्यांना सगळ्यात जास्त गुण मिळाले.

भारतात आल्यावर वल्लभभाईं गांधीजींच्या सहवासात आले त्यांच्यावर गांधीजींचा खूपच प्रभाव पडला. त्यांनी वकिली सोडली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले. त्यांनी गुजरातमध्ये शेतकऱ्यांना सवलत देण्याची विनंती केली होती, परंतु शेतकऱ्याच्या या प्रस्तावाला ब्रिटिश शासनाने धुडकावून लावले. त्या वेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी मोठ्या प्रमाणावर 'नो टॅक्स कॅपेन' या मोहिमेचे नेतृत्व केले आणि शेतकऱ्यांना कर न भरण्यास प्रोत्साहन दिले.

या संघर्षामुळे ब्रिटिश शासनाला सरदार पटेलांच्या दृढ संकल्पापुढे झुकण्यास मजबूर व्हावे लागले आणि शेतकऱ्यांना 'करा' मध्ये सवलत द्यावी लागली. स्वातंत्र्य चळवळीत सरदार वल्लभभाई पटेलांचे हे पहिले मोठ यश मानल्या गेले.

सरदार वल्लभभाई पटेल यांची बायोपिक फिल्म ''सरदार'' १९९३ साली प्रदर्शित झाली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शक केतन मेहता होते. या चित्रपटात सरदार वल्लभभाईची भूमिका परेश रावल यांनी साकारली होती. तसेच भारताच्या सर्वोच्य जागतिक सन्मान 'भारत रत्न' सन्मानाने गौरविण्यात आले. त्यांचा जन्मदिवस ३१ ऑक्टोबर ला २०१४ साली राष्ट्रीय एकता दिवसाच्या रूपात घोषित करण्यात आले.

सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्वास्थ बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांची प्रकृती एवढी बिघडली की ते अंथरुणावरून उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० ला आलेल्या हृदयविकाराच्या तिव्र धक्याने या महान आत्म्याची प्राणज्योत मालवली.

असा भारत हवंय...

■ **लखन उमाजी नन्नावरे** बी. ए. भाग २

'असा भारत हवयं.....
जिथे सगळ्यांची जात ही भारतीय असेल.
धर्म, देशप्रेम
उच्च, नीच, भेदभाव सीमा पार असेल
नातं असेल भारतीयत्वाचं
सुख-शांति समाधान मिळेल
शत्रूचा थरकाप सुटेल
एवढी विचारांना धार असेल
प्रत्येक भारतीयांच्या अन्यायावर होणारा
वार असेल.
जगातल्या प्रत्येक व्यक्तींच्या मनात
भारता-विषयी आदर असेल
असा माझा भारत देश असेल.

भारतीय संस्थानाच्या विलिनीकरणात सरदार पटेल भूमिका

■ **माधुरी हारामी** एम. ए. (इतिहास) भाग १

ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून भारतीयांची सुटका व्हावी यासाठी अनेक भारतीय स्वातंत्र्यसेनानी, थोरपुरुष व क्रांतिकारकांच्या बलिदानातून अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य देण्यात आले, परंतु स्वातंत्र्य देत असतानाच ब्रिटिशांनी भारत अखंड असणार नाही याची व्यवस्था करून ते जात होते. एकीकडे भारत स्वतंत्र होत असल्याचा आनंद तर दुसरीकडे अनेक संस्थांने स्वतंत्र राहू इच्छित होती. काही संस्थाने स्वत:ला पाकिस्तानमध्ये विलीन करून घेण्यास इच्छूक होती. तसेच या संस्थानात अराजकता सुद्धा माजलेली होती, जातीय दंगली सुरू होत्या. या संस्थानांतील समस्या सोडविणे आणि यांना भारतीय संघराज्यात विलीन करून घेणे, हा मोठा गंभीर प्रश्न स्वतंत्र होत असलेल्या भारतापुढे उभा राहिला होता. एका डोळ्यांत आनंद तर दुसऱ्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते, अशी विदारक परिस्थिती निर्माण झालेली होती.

भारताला स्वातंत्र्य देत असताना १८ जुलै १९४७ च्या स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार ज्या संस्थांना स्वतंत्र राहायचे असेल अशा संस्थानांना स्वतंत्र राहण्याची मूभा देण्यात आली होती. त्यामुळे ५६५ संस्थानांना भारतीय संघराज्यात विलीन करणे सर्वात मोठी समस्या होती. या सर्व संस्थांनाना भारतीय संघराज्यात विलीन करण्याचे अविस्मरणीय आणि अतुलनीय कार्य भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी केले. त्यांना व्ही. पी. मेनन यांची मोलाची मदत मिळाली. जर सरदार पटेल यांनी संस्थानांचे विलीनीकरण करून घेतले नसते तर कदाचित हैदराबाद, जुनागड आणि काश्मीर अशी काही नवीन राष्ट्रे निर्माण झाली असती आणि आपल्याला येथे जाण्यासाठी पासपोर्ट देखील काढावा लागला असता, असे कठीण आणि जिकीरीचे काम सरदार पटेल यांनी

केले. त्यांचे भारतीयांनी करावे तेवढे कौतुक आणि गौरव कमीच आहे.

भारतीय संस्थानांनी भारतापासून वेगळे राहणे, हे भारतासाठी अतिशय दुःखाची बाब होती. कारण हजारो क्रांतिकारकांनी भारताला अखंड व स्वतंत्र राहावं यासाठी आपले बलिदान दिलेले होते. ते स्वप्न भारत स्वतंत्र झाल्यानंतर एकसंघ राहणे कठीण झालेले होते. सरदार वल्लभभाई पटेल यांना भारताचे तुकडे तुकडे होणे अजिबात पसंद नव्हते. भारतात संस्थानांच्या विलिनीकरणाची जबाबदारी सरदार पटेलांकडे सोपविण्यात आली. त्यांना संस्थान मंत्रालयाचे प्रमुख बनविण्यात आले होते. पटेलांनी अनेक संस्थानांशी करार करून त्यांना भारतीय संघराज्यात सामील करून घेतले. काही संस्थानिकांना समजावून तर काही प्रसंगी संस्थांनी त्यांना हातातील काठीचा इशारा देऊन सरदार पटेल यांनी संस्थानांना भारतीय संघराज्यात सामील करून घेतले.

१५ ऑगस्ट १९४७ पूर्वी बरीचशी संस्थाने स्वतःहून भारतीय संघराज्यात सामील झाली होती. परंतु जुनागड, हैदराबाद आणि काश्मीर या संस्थानांनी भारतीय संघराज्यात सामील होण्याच्या करारावर स्वाक्षरी केलेली नव्हती. त्यांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला होता व स्वतंत्र राहण्याचा त्यांचा मानस होता. या संस्थानांवर सरदार पटेल यांनी लष्करी कारवाई करून ही संस्थांने भारतात सामील करून घेतली.

भारतात जे ५६५ संस्थाने होती त्यातील सर्वात मोठे संस्थान म्हणजे हैदराबाद होय. हे संस्थान भारताच्या मध्यभागी होते. त्यामुळे हे संस्थान स्वतंत्र किंवा पाकिस्तानमध्ये सामील झालं तर याची कीड इतरही संस्थानांना लागेल, अशी भीती सरदार पटेल यांना होती. या संस्थानात बहुसंख्य प्रजा हिंदू होती, मात्र शासक निजाम होता. निजामांची भारतात सामील होण्याची अजिबात इच्छा नव्हती. म्हणूनच त्यांनी भारत सरकारकडे जैसे थे करार करून एक वर्ष मुदत मागून घेतली. भारत सरकारने जबरदस्तीने हैदराबाद संस्थानाला सामावून घेतले तर भयंकर उत्पाद केला जाईल, अशी भूमिका निजामाने घेतली होती. हैदराबाद संस्थानात कासीम रिझवीच्या नेतृत्वाखाली रझाकारांनी हिंदूच्या सरसकट कत्तली, स्त्रियांवर अत्याचार, लुटालूट, जाळपोळ असे प्रकार सुरू केले होते. त्यामुळे लोक हैदराबाद मधून रेल्वेने प्रवास करायला सुद्धा घाबरू लागले होते. अशा संकटकालीन परिस्थितीत सरदार पटेल व पाकिस्तानचे लियाकत अली यांची भेट घडून आली. 'दीड कोटी हिंदूंना आम्ही कंठस्नान घालणार आहोत हे जर कासिम रिझवीचे वक्तव्य खरे असेल तर निजाम आणि त्यांचा राजवंश याचे कोणतेच भवितव्य उरणार नाही.' अशी कडवट प्रतिक्रिया पटेलांनी या भेटीदरम्यान दिली होती. इतर संस्थानिकांचा जसा प्रश्न सुटला तसाच हैदराबादचाही सुटावा, अशी आमची इच्छा आहे असे सरदार पटेल यांचे म्हणणे होते. हैदराबाद मधील जुलूम जनतेवरील वाढताच हे लक्षात घेऊन प्रजेच्या मदतीसाठी सरदार पटेल यांनी लष्करी कारवाई करून १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद शहर ताब्यात घेतले व एक नोव्हेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यात आले.

जुनागड हे संस्थान देखील भारतापासून स्वतंत्र राहू इच्छित होते. या संस्थानातील बहुसंख्य प्रजा ही हिंदू होती आणि शासक मात्र नवाब महाबदखान हा मुस्लिम होता त्यामुळे महाबत खानाने सुरुवातीला जरी स्वतंत्र राहण्याचा विचार केला असला तरी पुढे मात्र त्याने जुनागड संस्थान पाकिस्तानात सामील करण्याच्या दृष्टीने बॅ. अहमद अली जीवाशी वाटाघाटी करणे सुरू केल्या होत्या त्यामुळे जुनागड संस्थान पाकिस्तानात सामील होणे भारताच्या दृष्टीने धोकादायक होते कारण या

संस्थानाच्या सीमा भारताच्या अनेक संस्थांना लागून होत्या यामुळे पुढे जाऊन पाकिस्तान कुरघोडी करू शकतो याची पूर्वकल्पना सरदार पटेलांना होती म्हणूनच सरदार वल्लभभाई पटेल यांनी ९ सप्टेंबर १९४७ रोजी भारतीय लष्कराला जुनागडमध्ये पाठवून लष्करी कारवाई केली व जुनागड संस्थान २० फेब्रुवारी १९४८ रोजी भारतीय संघराज्यात सामील करून घेतले.

सर्वात कठीण पेचप्रसंग होता तो कश्मीर संस्थानाचा. या संस्थानानेसुद्धा स्वतंत्र राहायचं ठरवलं होतं. त्या वेळी कश्मीरचा राजा हरिसिंह होता. राजा हिंदू आणि बहुसंख्या जनता मुस्लिम, अशी परिस्थिती या संस्थानाची होती. यामुळे प्रजेचा कल पाकिस्तानात सामील होण्याकडे होता. भारताचे उपपंतप्रधान व गृहमंत्री सरदार पटेल यांनी राजा हरिसिंगला सांगितलं होतं की, १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारत किंवा पाकिस्तानमध्ये सामील होण्याचा निर्णय काश्मीरने घ्यावा. कुठल्याही परिस्थितीत कश्मीरला स्वतंत्र राहता येणार नाही. काश्मीर हे पाकिस्तानला सुद्धा हवं होतं आणि त्यामुळे पुढे ऑक्टोबर १९४७ मध्ये पाकिस्तानने आपल्या टोळ्या घुसवून उपद्रव करायला सुरुवात केली. त्या वेळी राजा हरिसिंहाच्या लक्षात आले की, काश्मीरचे स्वातंत्र्य धोक्यात आलेले आहे, म्हणून राजाने भारत सरकारकडे मदतीची याचना केली. सरदार पटेल यांनी सांगितले की जोपर्यंत राजा हरिसिंह काश्मीर विलगीकरणावर स्वाक्षरी करीत नाहीत तोपर्यंत आपण कश्मीरच्या मदतीला लष्कर पाठवू शकत नाही. अशी भूमिका सरदार पटेल यांनी घेतल्यामुळे राजा हरिसिंहजवळ भारतात सामील होण्याशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नव्हता. राजा हरिसिंहाने २४ ऑक्टोबर १९४७ रोजी भारत सरकारशी संपर्क करून विलिनीकरणाच्या करारावर स्वाक्षरी केली व नंतर भारत सरकारने काश्मीरमध्ये आपले लष्कर पाठवून पाकिस्तानी टोळ्यांना काश्मीरमधून हुसकावून लावले आणि शेवटी कायदेशीरपणे २६ ऑक्टोबर १९४७ ला काश्मीर संस्थान भारतात सामील करण्यात आले.

सरदार वल्लभभाई पटेल व विपी मेनन यांनी आपल्या अनुभवाचा व तल्लक बुद्धीचा वापर करून हैदराबाद, जुनागड आणि काश्मीर या स्वतंत्र राहू इच्छिणाऱ्या व पाकिस्तानात सामील होऊ पाहणाऱ्या संस्थानांवर लष्करी कारवाई करून त्यांना भारतीय संघराज्यात सामील करून घेतले. सरदार पटेल यांनी यशस्वीपणे कार्य केले नसते तर कदाचित भारताचे विभाजन झालेले आपल्याला दिसले असते. संस्थानांचे विलिनीकरण करून अखंड भारताची निर्मिती केली. या दृष्टीने सरदार पटेलांनी केलेल्या अविस्मरणीय व अतुलनीय कार्याची दखल भारत आणि भारतीय जनता नेहमीच घेत राहील.

स्वातंत्र्यानंतर भारतापुढील आव्हाने

■ **हर्षा राऊत** एम. ए. (मराठी) भाग १

''एकच तारा समोर, आणिक पायतळी अंगार,
गर्जा जयजयकार क्रांतीचा, गर्जा जयजयकार।''

कवी कुसुमाग्रज यांनी केलेल्या या आव्हानाचे सार्थक होण्यास १५ ऑगस्ट १९४७ चा दिवस उजाडला. पक्षी पिंजऱ्यातून उडाला स्वातंत्र्याची रम्य प्रभात झाली. असंख्य बलिदानाचे सार्थक झाले आणि भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले. बघता –बघता स्वातंत्र्याचा प्रवास ७५ वर्षाचा होत आहे. आज आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. एखाद्या राष्ट्राच्या जीवनात ७५ वर्षे पूर्ण करणे अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपली स्वातंत्र्याविषयी कोणती स्वप्ने होती? स्वातंत्र्याकडून आपल्या कोणत्या अपेक्षा होत्या ? आज सत्य काय आहे ? कुठे होतो आपण आणि आता कुठे आहोत..? उणिवा काय राहिल्या आणि आता भविष्यात कशी पावले उचलावी लागतील...? याचा विचार आपल्याला करावा लागेल. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपण काय कमावलं आणि काय गमावलं! याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. भारत हा नैसर्गिक साधनसंपत्ती आणि खनिजसमृद्ध देश आहे. उत्तरेला हिमालय उभा आहे. दक्षिणेला सागराच्या लाटा लोळण घालत आहेत. देशातून गंगा, गोदावरी, ब्रम्हपुत्रा सारख्या नद्या वाहत आहेत. पक्षी आकाशी भरारी मारतो आहे. सैनिक आणि जवान डोळ्यांत तेल घालून देशाची सीमा रक्षण करत आहेत. शेतकरी लोकराजा बनला आहे. आपल्या देशाला शिमला, कुलूमनाली, उटी यासारखी समृद्ध पर्यटनस्थळे लाभली आहेत. एकूणच आपला भारत देश 'सुजलाम–सुफलाम' आहे.

आपल्या देशाला पौराणिक आणि ऐतिहासिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक जाती, धर्माचे, भाषांचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर यांच्यासारख्या थोर संतांची भूमी असलेल्या आपल्या देशाची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. भारत एकाच वेळी अध्यात्मात आणि विज्ञानातही अग्रेसर आहे. अनेक खेळ प्रकारात भारताने जागतिक दर्जाची

कामगिरी केली आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली ७५ वर्ष साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रांमध्ये नामवंत लेखक, साहित्यिक व कलावंतांनी आपला अमीट ठसा उमटवला आहे.

पण असे असले तरी एकीकडे प्रगती होत आहे आणि दुसरीकडे अनेक गोष्टी आपल्याला वेदना देत आहेत. स्वातंत्र्यासाठी अनेक शूरवीरांनी ऐन तारुण्यात बलिदान दिले. आपले संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यासाठी खर्च केले. स्वातंत्र्यासाठी त्यांनी रक्ताचा सडा शिंपला. पण आम्ही मात्र रक्ताचा घाऊक बाजार मांडला असे कधीकधी उगाचच वाटते.

आज चीन-पाकिस्तान सारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. देशांमध्ये दहशतवादी हल्ले होतात. उरी, पुलवामासारख्या रक्ताळलेल्या आठवणी आपणास दु:ख देतात. या देशातल्या शेतकऱ्याला आपल्या हक्कासाठी आंदोलन करावे लागते. अनेक गरिबांना एक वेळचे जेवनसुद्धा मिळत नाही. स्वर्गासारखा काश्मीर गुलाबाच्या सुगंधाने दरवळत राहण्याऐवजी रक्तात रंगताना पाहायला मिळतो. धर्माच्या नावावरून जातीय दंगली होतात. तेव्हा स्वातंत्र्याच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडतात. भारतमातेच्या हृदयाचे शेकडो तुकडे होतात. एकाच आईची लेकरे एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतात. त्या आईची काय अवस्था होत असेल....? या साऱ्या आक्रमणांमध्ये अतिशय सामान्य माणूस भरडला जातो. जळणारी झोपडी आणि करपणारे रक्त मात्र भारतीयच आहे... हे आपण का विसरतो? हा खरा प्रश्न आहे. भ्रष्टाचाररूपी यंत्रणेमुळे मोठी व्यवस्था पोखरली जाते. रोज मोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते. तेव्हा ज्यांच्या हाती आपण देशाची प्रशासनव्यवस्था सोपवली आहे.... तेच भ्रष्टाचाराने ग्रस्त पाहून असंख्य वेदना होतात. तुरुंगात असताना अनेक गुन्हेगार निवडणुका जिंकतात दरवर्षी मोठमोठे घोटाळे उघडकीस येतात. सामान्य माणसाच्या हक्काची भाकरी खाणारी मंडळी या देशाचे मारेकरी आहेत. 'सत्यमेव जयते' हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान असतांना प्रत्यक्षात आपण विरूद्ध आचरण करतो.

मला अपेक्षित भारत

■ **श्रृती दिलीप चापले** बी.एस्सी. भाग ३

''जहाँ डाल डाल पर सोने की,
चिडीया करती है बसेरा ।
वो भारत देश है मेरा,
वो भारत देश है मेरा ।।''

असं म्हटल्यावर आपलं उर अभिमानाने भरून येतो, आपली मान गर्वाने ताठ होते. माझा भारत देश आहेच तसा, पश्चिमेला अथांग समुद्र, पूर्वेला हिमालयाची सावली, दक्षिणेला स्वामी विवेकानंदाची कन्याकुमारी तर भारतमातेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्यासारखे स्वर्गाहूनही सुंदर असे काश्मिर.

'' जिथे शेतकरी, सैनिक, स्त्रियांना आदराचे स्थान असेल, श्रीमंतीचे, धर्मांधता, भ्रष्टाचार, अंधश्रद्धेचे नाव नसेल, असा भारत मला अपेक्षित आहे. आपल्या भारतीय संविधानात न्याय, समता, बंधुता या मूल्यांचा समावेश केलेला आहे. आपले भारतीय संविधान हे संपूर्ण जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या या दिवसांपुरतेच आपले देशप्रेम सीमित राहावे का? मुळीच नाही, मी आज तुम्हाला मला अपेक्षित असणाऱ्या भारताविषयी सांगणार आहे,

'' हिंद देश के निवासी सभी जन एक है,
रंग, रूप, वेष, भाषा चाहे अनेक है। ''

आज आपला भारत देश विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिक, शैक्षणिक क्षेत्रांत पुढे पाऊल टाकत आहे. आपल्या भारत देशात हिंदू, मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, पारशी अशा अनेक जाती धर्मांतील लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत, परंतु काही देशविघातक, समाजविघातक, शक्ती युवावर्गाला वेगवेगळ्या प्रकारची आमिषे दाखवून व्यसनाधीन बनवून आपल्या देशाच्या अखंडतेला एकतेला बाधा आणण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे देशाचा जो आधारस्तंभ आहे. अशा युवावर्गाने वेळीच सावध होणे गरजेचे आहे.

मला वाटतं माझ्या कनिष्ठ वर्गातील नागरिक मग तो शेतकरी असू दे नाहीतर रोजंदारी काम करणारा कामगार असू दे त्यांच्या हाताला कायमस्वरूपी काम, त्यांच्या वृद्धापकाळासाठी, त्यांच्या उदरनिर्वाहासाठी काही आर्थिक व्यवस्था करण्यात यावी जेणेकरून त्यांचे म्हातारपणीचे जगणे सुसह्य होईल. तसेच बेरोजगारांना रोजगार मिळविण्यासाठी पर्यटन हा आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचा स्त्रोत ठरू शकतो. कारण आपल्या देशातील अनेक स्थळे जागतिक वारसा स्थळांच्या यादीत झळकले आहेत. त्यामुळे जगभरातून येणारे पर्यटक आपल्या

देशामध्ये येण्यास मदत होईल व त्यातून रोजगार निर्मिती सुद्धा होईल. आपल्या देशाला लाभलेली सगळ्यात मोठी किड कोणती असेल तर ती भ्रष्टाचाराची. ही किड समूळ नष्ट करण्यासाठी कायदे अधिक कठोर करणे गरजेचे आहे. ज्या दिवशी माझ्या देशातील कोणतीही मुलगी किंवा कोणतीही स्त्री सुनसान रस्त्यावरून निर्भीडपणे फिरेल, तो आपल्या भाग्याचा दिवस असेल.

कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला साडी चोळी देऊन परत पाठवितांना शिवाजी महाराजांनी म्हटले होते

''अशीच आमुची आई असती सुंदर रूपवती
आम्हीही सुंदर झालो असतो वदले छत्रपती''

हे शब्द इथल्या प्रत्येक तरुणांसाठी आदर्श ठरतील व ते तसे वागतील असाच आहे मला माझा अपेक्षित भारत. माझ्या भारतात कोणतीही नाजुक कळी गर्भात खुडली जाणार नाही. कोणत्याही प्रकारची भ्रूणहत्या होणार नाही. स्त्रियांकडे वाईट नजरेने पाहण्याची कुणाचीही हिंमत होणार नाही.

माझा भारत हा व्यसनमुक्त असेल. आपण आपले घर व घराचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवतो. पण जेव्हा आपण घराच्या बाहेर जातो तेव्हा रस्त्याच्या कडेला असलेल्या कचऱ्याकडे आपलं लक्ष जातं का? बऱ्याचदा हा कचरा आपण कळत-नकळतपणे वाढविण्याचं काम करीत असतो. जसं घर आपलं आहे तसं गाव, देश आपला आहे, ही आपलेपणाची भावना का बरं येत नाही? जेव्हा ही भावना प्रत्येक भारतीयांच्या मनात निर्माण होईल तेव्हा स्वच्छ सुंदर भारताचे स्वप्न साकार होईल, माझ्या भारतात शहरीकरणाबरोबरच वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. तेव्हाच संत तुकोबा महाराजांचे बोल खरे ठरतील.

''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे
पक्षीही सुस्वरे आळविती'' हे तुकोबा महाराजांचे बोल पुन्हा एकदा माझ्या भारत भूमीवर घुमू दे.

माझ्या भारत देशामध्ये माझ्या देशाचा कृषिमंत्री शेतकरीच असेल आणि माझ्या देशाचा क्रीडा मंत्री हा एक खेळाडूच असेल. माझा भारत देश जात, धर्म, पंथ, बाजूला सारून माणसाला माणूस समजणारा एकमेकांच्या सुख- दु:खात सहभागी होणाऱ्या, एकमेकांचे सण-उत्सव साजरे करणारा, देशाच्या विकासाला हातभार लावणारा, पर्यावरणाचे महत्त्व जाणून प्रदूषणाला दूर सारणारा व वृक्षाचे जतन संवर्धन करणारा असावा. मला अपेक्षित भारत भ्रष्टाचार मुक्त, प्रदूषणमुक्त, धर्मनिरपेक्ष, विज्ञान, तंत्रज्ञानात आघाडीवर स्वयंरोजगार निर्माण करणारा अखिल विश्वात अग्रस्थानी असावा, असे मला प्रामाणिक वाटते.

देशभक्ती

■ **प्राची धारणे** बी. ए. भाग १

ज्या गोष्टीचे महत्त्व व्यक्तिगत स्वार्थापेक्षा आपल्याला अधिक जाणवते, अशा गोष्टीप्रती आपण आपली भक्ती व्यक्त करत असतो. देव असो वा देश असो, भक्ती हा आपल्या देशवासीयांसाठी एक जीवनाचा मार्ग ठरलेला आहे. त्यामुळे खरी देशभक्ती ही संपूर्ण देशाचा आणि येथील नागरिकांचा विकास घडवून आणू शकते. एका विशिष्ट अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक आधारावर उभा असलेला आपला भारत देश याबद्दल आपल्याला वाटणारा कमालीचा आदर आणि अशा सांस्कृतिक मूल्यांच्या वृद्धीसाठी देशाप्रती केली जाणारी कृती म्हणजेच प्रत्येक नागरिकासाठी देशभक्ती आहे.

कोणत्याही जाती-धर्म आणि पंथाच्या नावाखाली देश विभागला जात असतो. या बाबी व्यक्तिगत स्तरावर सांभाळून वेगळ्या विकासात बाधा पडू नयेत. यासाठी ठोस कायदे, नियम सर्वांसाठी सारखेच लागू असावेत. अशा काही गोष्टी सामाजिक स्तरावर व्यवस्थित राबवल्यास देशभक्तीसाठी पाया तयार होऊ शकतो. देश हा फक्त सीमेवर निर्धारित न होता तेथील लोकांच्या क्षमतेवर आणि त्याच्या कर्तृत्वावरही निर्धारित केला गेला पाहिजे. तसेच आपली देशभक्तीची संकल्पना ही हिंसाचार नसली पाहिजे. येथील नागरिकांसाठी जगण्याच एक स्वप्न सामाजिक वातावरण निर्मिती करणे म्हणजेच देशभक्ती होय.

देशभक्ती ही फक्त स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनादिवशीच न राबवता प्रत्येक क्षणी ती आपल्या कृतीतून दिसायला हवी. जगण्याचा व्यक्तिगत उद्देश असला तरी सामुहिक स्तरावर एक उदात्त हेतू म्हणून आपण आपल्या देशासाठी छोटे-मोठे कार्य करू शकतो. उज्ज्वल आणि विकसित भारताच्या निर्माणासाठी सामाजिक आणि नैतिक मूल्यांची जोपासना करीत येथील प्रत्येक नागरिकाने व्यक्तिगत स्वातंत्र्य अनुभवले पाहिजे, अशी दूरदृष्टी ठेवून आपण आपल्या देशातील प्रत्येक व्यक्तीत देशभक्ती जागृत करायला हवी. अशा प्रगतशील देशाचे स्वप्न पूर्ण करण्याच्या हेतूने अंतर्गत कलह मिटवून सर्व देशवासीय देशाच्या विकासासाठी निर्मळ मनाने आणि देशभक्ती भावनेने एकत्र आले पाहिजेत; तेव्हा त्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाच्या पद्धतीला खरी देशभक्ती म्हणता येईल.

भगतसिंगाच्या स्वप्नातील स्वतंत्र भारत आणि आजचा भारत

■ कु. अश्विनी खुशाल ठाकरे बी. ए. भाग ३

आजादी और जिंदगी एक बात है, गुलामी और मौत एक बात है। हा भगतसिंग यांनी राष्ट्राला दिलेला शेवटचा संदेश नाही, ज्यामध्ये शेकडो क्रांतिकारकांचे त्यागी जीवन व बलिदान नाही, तर तो भारताचा स्वातंत्र्यसंग्राम म्हणजे भाषणबाजीच्या शुल्लक निर्बंधभंगाच्या आणि कारावासाच्या निष्फळ निरस आंदोलनाव्यतिरिक्त काहीही उरणार नाही; तर परकीय ब्रिटिश सत्तेला भारताबाहेर हाकलून लावण्यासाठी भारतीयांनी केलेला प्रयत्न म्हणजेच भारतीयांचा स्वातंत्र्यलढा होय.

आजवर जे जे क्रांतिवीर फासावर चढले, ज्यांनी स्वतःला स्वातंत्र्याचा संग्रामलढ्यात आपले सर्वस्व दिले, त्यापैकी एक महान क्रांतिकारक म्हणजेच सरदार भगतसिंग होय. सरदार भगतसिंग यांचे संपूर्ण आयुष्य संघर्षपूर्ण होते, आजचे तरुणही त्यांच्या आयुष्यातून प्रेरणा घेतात. आज देशातील तरुणांना खऱ्या अर्थाने भगतसिंगांच्या विचारांची गरज आहे. त्यांच्या विचारातूनच एक समाजवादी राष्ट्र आपण निर्माण करू शकतो.

'तुजसाठि मरण ते जनन
तुजवीण जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण'

क्रांतिकारकांच्या देशभक्ती, स्वातंत्र्य, शोषणविरहित समाजरचना निर्माण करणे ह्या क्रांतिकारी लढ्याच्या प्रमुख प्रेरणा होत्या.

सरदार भगतसिंग यांचा जन्म पंजाब प्रांतातील ल्यालपूर जिल्ह्यातील बंगा या गावी २८ सप्टेंबर १९०७ मध्ये झाला. सरदार भगतसिंग यांना लहानणापासूनच देशभक्तीचे धडे शिकविले गेले. त्यामुळे आपल्या देशावर अन्याय, अत्याचार करणाऱ्या ब्रिटिश सत्तेला भारताबाहेर हाकलून लावले पाहिजे असा देशभक्तीचा प्रवाह त्यांच्या नसा नसात लहानपणापासूनच वाहत होता.

भगतसिंग आपल्या सवंगड्यांना प्रश्न विचारतात की, तुम्हाला काय व्हायचं आहे? काहीजण डॉक्टर, काहीजण ऑफिसर, एकाला दलाल व्हायचं होतं. पण त्यावेळी भगतसिंग म्हणाले की, मित्रहो मी मोठा झालो की इंग्रजांना भारतातून हाकलून लावणार आहे. एकीकडे आजचा भारत पाहिले असता असा देशभक्तीचा प्रवाह आताच्या तरुणांमध्ये दिसत नाही. भारताला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करून सुजलाम सुफलाम करण्याचे भगतसिंगांचे स्वप्न होते.

ब्रिटिश काळात चाललेल्या शेतकरी व मजदूर वर्गावरील अन्याय, अत्याचारापासून मुक्तता व्हावी व सत्ता ही किसान व मजदूर यांच्या हाती यावी असे

भगतसिंग यांच्या क्रांतिकारी चळवळीमध्ये भाग घेण्याचा मुख्य उद्देश होता. कामगार हा राज्याचा मुख्य घटक असावा, त्याचे भांडवलदाराकडून शोषण होऊ नये असे भगतसिंगांचे प्रतिपादन होते. त्यासाठी त्यांनी आयर्लंड, इटली आणि रशिया या देशातील क्रांतिकारकांचा अभ्यास केला असता त्यांच्या विचारांची पकड अधिक घट्ट होत गेली. तो विचार हाच की क्रांति, युद्ध यामुळे स्वातंत्र्य मिळून शकते आणि म्हणूनच देशातील तरुणांना क्रांतीकडे वळविले पाहिजे यासाठी त्यांनी तरुणांना एकत्र आणण्यास सुरुवात केली.

जगात जर सर्वात भयानक पाप कोणते असेल तर ते गरिबी आणि सर्वात मोठा शाप कोणता असेल तर दास्य (गुलाम) हा आहे. म्हणून श्रीमंत गरीब यातील दरी नाहिशी झाली पाहिजे; त्यांच्यावरील अन्याय दूर झाले पाहिजे राज्य हे भारतातील जनतेच्या हाती असावे हा एक महत्त्वाचा उद्देश भगतसिंग यांचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यामागे होता.

स्वतंत्र भारतात समाजवाद जन्माला यावा ही भगतसिंगांची अपेक्षा आजही पूर्णत्वास गेलेली नाही. स्वतंत्र भारत अनेक समस्यांना कवटाळून बसलेला आहे. राज्यकर्ते बदलले गोऱ्यांच्या जागी काळे आले पण कार्यप्रणाली मात्र बदलली नाही. त्यांची स्थिती आजही पारतंत्र्याप्रमाणेच आहे.

'मानवा मानवा काय ही स्थिती
किड्यांचे मरण जिण्याची भिती
काय ही लाचारी अलोट हे दुःख
जाळत जीवन भूक ही किती'

अशीच आहे. फिरंगा गेला आणि तिरंगा आला पण जनसामान्यांचे जीवन पालटले नाही. पुन्हा वेगवेगळ्या रूपाने नवीन गुलामगिरी प्रस्थापित होऊ पाहते आहे.

भगतसिंग यांच्या वीरतेचे आकर्षण आणि त्यांच्या कार्याचा अभिमान प्रत्येक भारतीयांच्या मनात आहे. असेच असंख्य क्रांतिकारी भगतसिंग भारतात जन्माला यावेत ही सदिच्छा प्रत्येकाची असते, पण भगतसिंग स्वतःच्या घरी नव्हे तर शेजारच्या घरी जन्माला यावा हीच अपेक्षा असते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांना फासावर चढावे लागले, ज्यांनी आपल्या सुखी संसाराचा त्याग केला, भारताला स्वातंत्र्य मिळवून त्याला सुजलाम सुफलाम करण्याचे स्वप्न पाहिले ते आता खरे होताना दिसत नाही. परकियांकडून त्यांच्या स्वप्नांचा, कार्याचा विचार न होणे यात गैर नाही, परंतु स्वकियांकडून नाकारणे हे देशभक्तीचे, देशप्रेमाचे लक्षण नाही. म्हणूनच,

'महापुरुषांना मरण असतो दोनदा
एकदा त्यांच्या वैऱ्याकडून
दुसऱ्यांदा त्यांच्या भक्तांकडून'

ह्या ओळी प्रचलित होताना दिसतात. सरकारी व निमसरकारी संस्थामधील गैरव्यवहार, भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात उघडकीस येत आहे. या लोकांनी देशहीत, देशप्रेम, भक्ती ही मूल्ये जणू काही बहिष्कृत केले आहेत. 'मेरे देश की धरती' या सुप्रसिद्ध चित्रगीताचे विडंबन झाले असून 'मेरे जेब की भरती' असेच समीकरण रूढ झाल्याचे दिसून येते.

'माझा देश माझा आहे
खाऊन खाऊन तो संपणार
आहे'

अशी विदारक वस्तुस्थिती निर्माण झालेली आपल्याला बघायला मिळते. भारतीयांचे स्वातंत्र्य धोक्यात आलेले आहे अशी परिस्थिती बऱ्याच क्षेत्रात दिसून येत आहे. गतकाळात इतिहास घडविलेल्या राष्ट्रपुरुषांच्या भारत मातेचे प्रतिनिधी आपण आहोत या गोष्टीचा आम्हा भारतीयांना विसर पडल्याची फार मोठी खंत आहे. असंख्य स्वातंत्र्यसेनानी, थोरपुरूष, क्रांतिकारक यांच्या बलिदानामुळे आपली ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्तता झाली आहे. म्हणूनच भारतीय स्वातंत्र्याचे रक्षण केले पाहिजे अन्यथा ह्याच शतकाच्या अखेरीस पुन्हा दुसऱ्यांदा भारतीय स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी 'ए हिंद के बहादूरो, अब वक्त की पुकार है ' असे म्हणण्याची वेळ आली आहे.

मी पाहिलेला महापूर

■ **श्वेता सहारे** बी. ए. भाग ३

या वर्षीचा पावसाळा खूपच भीतिदायक होता. इतका पाऊस येत होता की, थांबायचं नावच घेत नव्हता. तीन दिवस झाले एकसारखा धो धो पाऊस पडतच होता. घरच्या आजूबाजूने नाल्यासारखे पाणी वाहत होते.

आम्ही सगळे भीत भीत राहत होतो. रात्र होत आली होती. आम्ही सगळ्यांनी जेवन केले आणि एका खोलीत सगळे झोपी गेलो. मला खूपच भीती वाटत होती. आईच्या कुशीत दडपून मी झोपी गेली.

अर्धी रात्र संपली होती की अचानक लाईन गेली. असे वाटत होते की, वीजेचे सगळे खांब पडले असावे तितक्यात माझे बाबा उठले अन् एक दोरखंड हातात घेतला व आमच्या घरच्या अंगणात असलेल्या मोठ्या लिंबाच्या झाडाला तो दोर बांधून ठेवला.

असे वाटत होते की, आपल्यावर आता मोठे संकट येणार आहे. बांबांनी सगळ्यांना झोपेतून उठविले आणि जागे राहण्यास सांगितले. ते नाल्यासारखे जे पाणी वाहत होते त्या पाण्याने आता उग्र रूप धारण केले होते. माझे बाबा घरच्या बाहेर गेले आणि त्या सीडीला धरून त्या उग्र पाण्यातून मार्ग शोधू लागले. तितक्यात बाबांच्या कंबरेच्या वरपर्यंत पाणी चढले.

आम्ही सगळे ते पाहातच होतो. आई रडत होती. ओरडत होती. बाबा कसे बसे त्या पाण्यातून बाहेर निघाले. बाबांनी मला खांद्यावर घेतले आणि ते आईचे हात धरून पाण्यात उतरले राहुल, काहीही झाले तरी मला घट्ट धरुन बस.... मी बाबांना घट्ट पकडले आई अन् बाबा त्या पाण्यातून बुडत बुडत कसेबसे बाहेर निघू लागले.

आई रडत रडत घराकडे बघू लागली. तितक्यात काय झाले घर मोडून वाहून गेले. आम्ही त्या पाण्यातून जीव वाचवण्यासाठी बाहेर येण्याचा प्रयत्न करू लागलो अन् पाणी वाढू लागले. होते. पाण्याचा प्रवाह इतका होता की, मी घाबरू लागलो.

किनाऱ्यावर येताच बाबांनी मला अन् आईला किनाऱ्यावर ढकलून दिले. अचानक त्या दोराने आमचा साथ सोडला, क्षणात वाटलं बाबा वाहून गेले पण थोड्याच दूर जाऊन बाबा झाडाच्या बुंध्याला धरून बाहेर आले.

आईने हंबरडा फोडला...आणि आम्ही बाबांच्या गळ्यात पडलो अन् रडू लागलो.

आता कळलं की, एका पुरग्रस्ताला आपल्या घराला गमवावे लागले, जीवात जीव नसतो... हीच आहे हो एक माझ्यासारख्या पुरग्रस्ताची आत्मकथा.

सहा कविता

■ कु.रेश्मा चंदनखेडे
एम. ए. (मराठी) भाग १

१ मी जन्मलो तेव्हा

उदरात मायेच्या अश्रूंना
किती शांत वातावरण होते
मी जन्मलो तेव्हा जग हे
निराळेच वाटले होते

आईच्या रक्ताचा गोळा मी
गर्भात होती निश्चिंत पणाने
नऊ महिने कसे लवकर निघाले
खंत वाटावं माझ्या मनाने

लाथा ही मारल्या कैकदा
ती सहन करत गेली
मायाळू माझी माऊली ने
तक्रार कधीच नाही केली

बाहेर येता रक्त बंबाळ होत
दुराव्तांना नाळ कापली
ती क्षणात गहिवरली थोडी
असह्य किती वेदना सोसली

रडू लागली जन्मली तेव्हा
मायेने उराशी घेतल
पाजण्या पान्हा
दुधाचे कर्ज तिचे माझ्या उरी
फिटणार नाही कधीच पुन्हा

२ शहिद जवान

आठवते मला ते
आठवणी चे दिवस
जेव्हा शहीत झालेत जवान
ती काळोखाची होती अवस
मायेने हंबरडा फोडला
आसवांचा पूर वाहू लागला
पत्नी अबोली झाली
तिलाही जिव जगणे छळु लागला
लेकरांनी धावा केला
बाप आमचा का असा रुसला
त्याच्या मुखातूनी रडण्याचं
असा किती कल्लोळ होता झाला
घर जणांचे भान हरपले होते
तसे गाव सुन सान वाट झाली होती
त्याच्या येण्याने दर दिवशी
इथे दिवाळीची रांगोळी सजली होती
जवान माझा शहीद झाला
याचे दुःख का मानू वाटते जीवाला
आमच्या रक्षणासाठीच त्याने
घर दार परिवार ए आज देह दान केला
असच वीर पुत्र येउदे पुन्हा
माझ्या उदरात मागतो दुवा
तूझ्या बलिदानचा आज
साऱ्यांनाच कसा लागला रे हेवा

३

गुरु

गुरूच सखा सोबती असतो
आपल्या संकट काळी
कुठेही असो आपण कधी
मार्ग दाखवितो वेळोवेळी
गुरु विना मार्ग नाही दुसरा
तो आहे मनून जीवनाला वळण
भित्रा असेल तो बनतो निर्भय
गुरुची असते अशीच घळण
काटे असोत की फुल वाटेत
सुख असो की दुःख दोन्ही
ज्ञान देई दोन्ही कलाचे
मार्गदर्शन करतो जीवनी
तयाचे आशीर्वाद सदा पाठी
चुकीचा वळण कधी सापडेना
असतील जरी किती संकटे
दिले ज्ञान गुरुचे विसरेना
आई वडील थोर उपकार
तयाचे संस्कार आमच्यावरी
शिक्षक दुसरे गुरु आमचे
निसर्ग विज्ञान नसे आम्हाला दुरी
अध्यात्मिक गुरु वदंन अमुचे
शिकवी खऱ्या जगण्याचे धळे
सेवा करावी दिन गरीबाची
यातच आम्हाला स्वर्ग कळे

४

भारतीय एकता

जाती धर्माचा वाद ना इथे
आहे सर्वांना समानता
जगभरात प्रसिद्ध आहे
भारतातली एकात्मता

हिंदू मुस्लिमए सिख इसाई
मानतात सर्व भाई भाई
सन असोत वेगवेगळे जरी
होळीत सारेच रंगुणी जाई

मान पान प्रत्येकाच्या घरी
जातीवाद कुणी विचारत नाही
आपलेच आहेत सर्व बंधू
या शब्दात एकता दिसें फक्त
ए दुजाभाव नाही

मी मोठाए की तू लहान
विसरले सारे भेदभाव
सुख दुःखात एक राहुनी
तुटेना यांचा मनातील
ऐकतेचा गाव

५

नजरेचा बाण

उरी घुसला माझ्या
तूझ्या नजरेचा तो बाण ग
तुला बघून सखे
हरवूनी बसलो माझं भान ग

ओढ तुझी लागली सखे
जाऊ नको माझ्या दूर
जातांना पाहुनी तुला
मनी उठे माझ्या काहूर

मुखडा तुझा लाजिरवाना
डोळे भरून पाहूदे ग
नयनाच्या गाभाऱ्यात
चित्र तुझे मला लपवू दे ग

कोवळी कळी तू ग
माझ्या मनाला तुच जिंकली
सौंदर्य पाहून तुझे हे
तुझ्यापुढे नजर माझी झुकली

साथ मागतो तुला
आयुष्याच्या वाटेवरी
फुलासारखी जपेन तुला
तुच माझी स्वप्नसुंदरी

माय मराठी

६

मराठी माय माझी
तिच्या कुशीत जन्मलो
अभिमान आम्हा मराठीचा
तिचाच गोडवा मी आजन्म गायलो

थोर उपकार मराठीचे
महाराष्ट्राची शान आहे
धन्य आहोत आम्ही लेकरं
तिचं मराठ्याचा सन्मान आहे

साधी भोळी माय मराठी
सर्वांना उमजली समजली
अर्थ किती मनमोकळे
भावना सर्वांच्या तीच जाणीली

गोडवा गाऊ किती थोर
तिचे अमूल्य आहे उपकार
आन बाणए शान अमुची
मराठी माय आहे किती थोर

काही कविता

■ **रामेश्वर बोपचे** संशोधक विद्यार्थी (मराठी विभाग)

लोकशाही की भोगशाही ही

लोकशाही की भोगशाही ही
प्रश्नच कळला नाही
लोकांनी लोकांच्या साठी
म्हणुनी गेले अब्राहम लिंकन
करी ना त्याचे कोणी चिंतन
सत्तेसाठी घडे पक्षांतर
ना पाळता कोणतेही अंतर
सत्तेसाठी घडे धर्मांतर
माणसात या पाडून अंतर
राष्ट्र पेक्षा एराजकारण महत्त्व नाही
करू नका सत्तेसाठी घाई
लोकशाही साठी आपण सारे
लोकहिताचे गाऊ नारे
विसरुनी सारे भेदाभेद
लोकशाहीत भरुया मोद

इडी

इडीची पेटवून बिडी
स्वर्गाला लाविती सीडी
इडी इडी म्हणती सारे
राजकारणाचे वाहती वारे
इडी लागता मागा वरती
श्रीमंतात होत असे गिनती
सर्वसामान्य गरिबांसाठी
लावेल का हो कोणी इडी
त्यांनाही स्वर्गात जायला
देईल का हो कोणी सीडी
गरीब बिचारे उपासी मरती
कोणीही नाही त्यांच्या वरती
गरिबांच्या कल्याणासाठी
करा वळती त्यांची खाती
इडी लागू द्या आमच्या वरती
श्रीमंतात होईल गिनती

माय मराठी

महाराष्ट्राची माय मराठी
वासराची गाय मराठी
ज्ञानोबाची ओवी मराठी
सद्गुणांची झोळी मराठी
तुकोबाची गाथा मराठी
सह्याद्रीचा माथा मराठी
शिवबाची तलवार मराठी
बाजीची ललकार मराठी
वारकऱ्यांची वाट मराठी
खंडाळ्याच्या घाट मराठी
पेशवाईचा थाट मराठी
अमृताचे माठ मराठी
लतादीदीचां सुर मराठी
गोदावरीचा महापूर मराठी
सचिनची बॅट मराठी
विकासाची वाट मराठी
महाराष्ट्राचा अभिमान मराठी
मराठ्यांचा स्वाभिमान मराठी
अशी आमुची मराठी राजभाषा
तिच्यापुढे मी नमवितो माथा

लोकमान्य

थोर नेते लोकमान्याना
आम्ही करतो प्रणाम
महाराष्ट्राच्या मातीत जन्मले
याचा मला अभिमान
गुलामीच्या युगात जन्मले
स्वराज्यासाठी खूप शिकले
इंग्रजीचे शिक्षण घेऊन
इंग्रजांशी खूप लढले
सांगून गेले इंग्रजांना
स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार
स्वराज्यासाठी मंत्र दिला त्यांनी
स्वराज्य स्वदेशी राष्ट्रीय
शिक्षण आणि बहिष्कार
मराठा ए केशरी पत्र रूपाने
विचार केले धारदार
मंडालेच्या तुरुंगात बसुनी
गीता रहस्य ए ओरायन लिहूनी
आर्याना त्यांचे मूळ दाखविलेए
झाला जयजयकारए
मवाळपणे स्वराज्य मिळेनाए
धारण केला जहाल बाणा
इंग्रजांची उडवुनी दैना
स्वराज्याचे स्वप्न बघुनी
उजेड केल्या लोकांच्या रैना
असे लोकमान्य होते महान
भारतमातेची खरी शान



गुलामी

गुलामीचे फेकून जोखड
स्वातंत्र्याची पहाट मोकळ
चौदा आगस्टची पहाट आली
स्वातंत्र्याची तयारी झाली
स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी
तिरंगी सजली भारत नक्षरी
तिरंग्यातील तीन रंग
बघुनी सारे झाले दंग
केशरी असे त्यागाचा
शौर्याचा अनब बलिदानाचा
पांढरा असे शांतीचा
सुखाचा अनब सौजन्याचा
हिरवा रंग हिरवाईचा
सुजलामब सुफलाम भूमातेचा
अशोक चक्र प्रतीक गतीचा
भारतमातेच्या प्रगतीचा
अशोक चक्रातील चोवीस आरे
म्हणती प्रगतीला साथ द्या रे!
खरे स्वातंत्र्य भोगावया
आत्मचिंतन आपण करूया
केशरी परी बलिदान करूया
स्वार्थाचा या त्याग करूया
पांढऱ्या परी शांती ठेऊनी
सुखशांतीचा संदेश देऊया
हिरव्या परी हिरवाई साठी
हिरवाईने नटवा माती
अशोकचक्र परी राहू गतिशील
देश बनवूया प्रगतिशील
तिरंगाचे राखाया सत्व
पटते का पाहू माझे तत्व
स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी
आपण सारे एक होऊया
सेवावृत्ती निरहांकारी पणाने
पृथ्वीवर या स्वर्ग निर्मूया

वर्तमान भारत : विकास आणि विषमता

■ **गुरुदेव विलास मोहुर्ले** एम. ए. (मराठी) भाग १

जागतिकीकरणापासून भारतात शहरीकरणाच्या विस्ताराची गती प्रचंड वाढली. १९९० नंतरच्या या शहरीकरणाच्या प्रक्रियेत विकास हीच संकल्पना मध्यवर्ती राहिली. शहरीकरणात ताणले गेलेले विविध अंतर्विरोध आणि वाढलेली विषमता या दोनही गोष्टी लक्ष्यात घेतल्यास सत्तेच्या केंद्रस्थानी असणाऱ्या अभिजन-वर्गाची अधिमान्यता प्रामुख्याने विकासाच्या परीभाषेतूनच घडवली जात आहे हे, दिसून येते.

'विकास' या संकल्पनेच्या परिभाषेची मुळे १९४० ते १९५० दरम्यान पाश्चिमात्य देशांतील औद्योगीकरणात पाहता येतात. आधुनिकतेच्या दिशेने पुढे जाण्यासाठी औद्योगिकीकरण आणि शहरीकरण या प्रक्रिया अत्यावश्यक मानल्या गेल्या. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रगतीसाठी भौतिक संपन्नता महत्त्वाची मानली गेली. त्यातून असा विश्वास निर्माण झाला की, आर्थिक वाढ आणि विकासासाठी भांडवली गुंतवणूक हाच महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे सहाजिकच गरीब देशांच्या प्रगतीची पूर्व अट भांडवली गुंतवणूक बनली हे नाकारता येत नाही त्यामुळे सहाजिकच गरीब देशांच्या विकासाचा मक्ता विकसित देशांकडे गेला. सर्वदूर संस्थात्मक पातळ्यांवर म्हणजे शहरे, वस्त्या, खेडी, गरीब जनसामान्य, शिक्षण संस्था, बाजार, घरेदारे कारखाने, हॉस्पिटल्स, सार्वजनिक कार्यालय आदी ठिकाणी विकासाच्या चर्चाविश्वाचा संचार होऊ लागला. या चर्चेतील गृहीतक 'गरिबी' आणि 'अविकसितता' ठरविले गेले. 'गरिबी' आणि 'अविकसितता' दूर करण्यासाठी आधुनिकीकरण करण्याचा आव आणत भांडवली गुंतवणूक मध्यवर्ती असलेली शहरीकरणाची प्रक्रिया वासाहतिक कालखंडात भारतात रूढ झाली.

विकास या संकल्पनेच्या मुळाशी असलेली ही गृहीतके नव्वदीनंतर तंत्रज्ञान व दळणवळणाच्या

साधनांच्या प्रगतीच्या मदतीने अफाट तुंबलेल्या भांडवलाने सुनियोजितपणे बदलली. बिगर शासकीय संस्थांमार्फत त्यांचे शासकीय स्तरावरून आऊटसोर्सिंग होऊ लागले. शासकीय स्तरावरून अनेक सार्वजनिक क्षेत्रे भांडवलाच्या गुंतवणुकीची क्षेत्रे म्हणून खुली होऊ लागली. भांडवलाला नफ्याची हमी देण्यासाठी देशोदेशींचे सरकारे स्पर्धा करू लागली आणि ज्याला जे जे पूरक तेथे विकास असे या संकल्पनेच्या बुडाशी नवे गृहीतक बनू लागले. सेवाक्षेत्राचा विस्तार, बाजार, रिअल इस्टेट, एक्सप्रेस हायवे, रस्ते उड्डाणपूल, उंच इमारती, मेट्रो, मनोरंजन क्षेत्र आणि सट्याची क्षेत्रही विकासाची मानके म्हणून पाहिली जाऊ लागली. एकूणच भारतातील विकासाची प्रक्रिया लक्षात घेतल्यास औद्योगिकरण, सहकार, शिक्षणप्रक्रियेतूनही जुन्या विषमतांचे पुनरुत्पादन नव्या स्वरूपात होताना दिसते.

या विकासप्रक्रियेत सत्तेच्या केंद्रस्थानी असणाऱ्या जात-वर्गाची अधिमान्यता घट्ट होत राहते व असंघटित कष्टकरी स्त्री-पुरुष, कामगार आदी मागास घटकांसाठी हिंसात्मक ठरते. त्यामुळे त्या विकासाला बळी पडलेल्यांचा वेगळा आवाज हळूहळू क्षीण होत जातो व त्यांच्यासाठी लढणाऱ्यांशी असलेला संवाद कमी कमी होत जातो. मग त्यांच्या वेदना अमूर्त आर्थिक संकल्पनाद्वारे आंतराष्ट्रीय स्तरावरील बौद्धिक चर्चेत मांडल्या जातात आणि विकासाचे बळी पडलेल्यांना त्यांच्या वेदना स्वतःच्या भाषेत सांगण्याचे स्वातंत्र्य ही आधुनिक ज्ञानव्यवस्था हिरावून घेते. 'त्यामुळे आज भारतीय विकासप्रक्रियेचा विचार करताना विकासातील या सर्व अंतर्विरोधाचा विचार करून वर्तमानातील विषमता समजून घेणे तितकेच महत्त्वाचे वाटते. त्यासाठी रूढ सामाजिक शास्त्रांच्या चौकटी पलीकडे जाण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी विशेषतः पाश्चात्त्य दृष्टीतील विकास संकल्पनाची उसनवारी टाळून स्थानिक वैशिष्ट्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाची जोड समाजशास्त्रीय अभ्यासास देणे आवश्यक आहे. त्यातूनच वैशिष्ट्यपूर्ण अशा स्थानिक संदर्भातील विकास, ग्रामीण-शहरी आदी परीभाषांच्या विश्लेषणाची अनेक दालने निश्चितच खुली होतील. वर्तमान भारतीय वास्तव समजून घेतांना काहीच बदललेले नाही किंवा सर्व काही बदलले आहे या दोन्ही भूमिकांचा चिकित्सकपणे वेध घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय भारतीय विकास आणि विषमता यातील वास्तव आणि त्यातील सत्य पुढे येणार नाही, असे वाटते.

माझ्या स्वप्नातील भारत

■ **उमेश भांडारकर** एम. ए. (इतिहास) भाग २

माझा भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे, विविधतेतील एकता आपल्या देशात पाहावयाला मिळते. परंतु आजही आपल्या देशातील काही लोक जात– पात आणि धर्माच्या नावावर भांडत आहेत. देशात भ्रष्ट्राचार, अशिक्षितता, बेरोजगारी, स्त्रियांवरील अत्याचार इत्यादी गोष्टी मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु मी एक वेगळ्याच भारताचे स्वप्न पाहतो. माझ्या स्वप्नातील भारत हा आजच्या भारताच्या उलट असेल. त्यात लोक बंधुतेने राहतील. माझ्या स्वप्नातील भारत एक असा देश असेल जिथे समानता व स्वातंत्र्याचा खऱ्या अर्थाने उपभोग घेता येईल. हा भारत एक असा भूमी राहील जेथे व्यक्तीला जाती, धर्म, पंथ, सामाजिक आर्थिक स्थिती इत्यादी गोष्टीवर भेदभाव न करता समान भावनेने पाहिले जाईल. मी भारताला एक अशा देशाच्या रूपात पाहू इच्छितो जेथे औद्योगिक आणि तांत्रिक विकास विपुल प्रमाणात असेल.

आज भारतातील काही क्षेत्रात विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. महिला सशक्तीकरण हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. जरी आज मोठ्या प्रमाणात महिला घरातून बाहेर निघून स्वतःची ओळख निर्माण करीत आहे तरी आजही महिलांविरुद्ध भेदभाव मोठ्या प्रमाणात सुरू आहे. स्त्रीभ्रूण हत्येपासून तर स्त्रियांवर होत असलेल्या घरेलू अत्याचारापर्यंत अशा अनेक गोष्टींवर कार्य करावे लागेल. भारतातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शिक्षण होय. आज जरी भारत सरकार शिक्षणावर भर देऊन लोकांना शिक्षणाविषयी जागृत करीत आहे तरीही देशातील काही भाग असे आहेत जेथे अजूनही शिक्षण पोहोचलेले नाही. यासाठी शासनाला आणखी एक पाऊल पुढे टाकून देशातील कोणताही व्यक्ती अशिक्षित राहता कामा नये याची खात्री करायला हवी. देशातील तिसरी सर्वात मोठी समस्या म्हणजे बेरोजगारी होय. आज देशातील मोठ्या प्रमाणात उच्चशिक्षित युवा रोजगारापासून वंचित आहेत. त्यांना योग्यता असतानाही योग्य रोजगाराची संधी मिळत नाही. यासाठी माझ्या देशात उद्योग व्यवसायांना प्रोत्साहन देऊन रोजगाराच्या संधी निर्माण करायला हव्यात. माझ्या स्वप्नातील भारतात प्रत्येक नागरिकाला काही न काही काम व नोकरीची संधी उपलब्ध राहील. आपल्या देशात धर्म, जात–पात इत्यादी गोष्टीमधील भेदभाव वाढत चालले आहे. अनेक लोक आपल्या धर्माचा प्रचार करण्यासाठी कट्टरतेचा आधार घेतात. मी स्वप्न पाहतो की एक दिवस भारत हा जात–पात मुक्त होऊन सशक्त राष्ट्र म्हणून स्वतःची ओळख निर्माण करेल. देशातील भ्रष्टचार हीदेखील एक महत्त्वाची समस्या मला आज जाणवते. आजही अनेक नेता, राजनेता स्वतःचे खिसे भरण्यासाठी लागलेले आहेत. मी अशा भारताचे स्वप्न पाहतो जेथील सर्व मंत्री पूर्णपणे देशाला समर्पित राहून, देशवासीयांच्या विकासासाठी कार्य करतील. माझे स्वप्न वास्तवात उतरो आणि माझ्या भारत देशाची प्रगती होवो.

राष्ट्रीय पर्यावरण असंतुलन आणि राष्ट्रीय पर्यावरणीय कायदे

■ कु. पूजा इंदूरकर बी. ए. भाग २

पर्यावरण हा शब्द 'परी' आणि 'कव्हर' या शब्दांपासून बनलेला आहे. ज्यामध्ये 'परी' म्हणजे आपल्या सभोवतालचे, म्हणजेच जे आपल्या सभोवतालचे आहे आणि 'कव्हर' जे आपल्याभोवती आहे.. पर्यावरण हे त्या सर्व भौतिक, रासायनिक आणि जैविक घटकांचे एकूण एकक आहे जे एखाद्या जीवावर किंवा परिसंस्थेच्या लोकसंख्येवर परिणाम करतात आणि त्यांचे स्वरूप, जीवन आणि जगणे निर्धारित करतात. संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेला हा दिवस जागतिक स्तरावर पर्यावरणाबाबत राजकीय आणि सामाजिक जागरुकता आणण्यासाठी साजरा केला जातो. याची सुरुवात १९७२ मध्ये ५ जून ते १६ जून दरम्यान संयुक्त राष्ट्र महासभेने आयोजित केलेल्या जागतिक पर्यावरण दिन ५ जून १९७३ रोजी साजरा करण्यात आला. संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेला हा दिवस जागतिक स्तरावर पर्यावरणाबाबत राजकीय आणि सामाजिक जागरुकता आणण्यासाठी साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या जैविक घटकांमध्ये सूक्ष्मजीवांपासून ते किटक, सर्व प्राणी आणि वनस्पती याशिवाय त्यांच्याशी संबंधित सर्व जैविक क्रियाकल्प आणि प्रक्रियांचा समावेश होतो. तर निर्जीव घटक आणि त्यांच्याशी संबंधित प्रक्रिया पर्यावरणाच्या अजैविक घटकांमध्ये येतात. जसे की : पर्वत, खडक, नद्या, हवा आणि हवामान इत्यादी घटक.

निसर्गावर मानवाचे अवलंबित्व अनादी काळापासून चालत आले आहे. म्हणूनच जगातील प्रत्येक संस्कृतीत निसर्गाच्या पूजेची तरतूद आहे. प्राचीन भारतीय समाज हा निसर्गबाबत खूप जागरुक होता. वैदिक काळात निसर्गाच्या विविध अंगाची, जमीन, पर्वत, झाडे, नद्या, प्राणी इत्यादींची पूजा केली जात असे.

निसर्गाप्रती माणसाच्या या असीम श्रद्धेमुळे आपोआपच पर्यावरणाचे रक्षण झाले. विकासाच्या आंधळ्या शर्यतीत माणसाने निसर्गाची मोठी हानी करायला सुरुवात केली. काही प्रमाणात तो तोटा निसर्ग स्वत:च भरून काढू शकला, पण स्वत:च्या पूर्णत्वाची मर्यादा संपल्यावर वातावरण असंतुलित झालं.

आजचा माणूस स्वार्थापायी निसर्गाचे शोषण करत आहे. होय, अति–उपयोगितावादी स्वभावामुळे निसर्गाचे विघटन करीत आहे.

तुम्हीच विचार करा, की तुम्ही निसर्गाची पूजा आणि आदर करत नाही, तुम्हाला निसर्ग ही उपभोगाची वस्तू सापडली आहे. अनेक कारणांमुळे पर्यावरणीय असंतुलन होत आहे. यामागे ते

नियोजनशून्यता आणि दूरदर्शी अर्थशास्त्रीय धोरण आहे.

आज आपण आपल्या स्वत:च्या आर्थिक क्रांतीसाठी तयार आहोत. त्यासाठी ''कोणतीही किंमत'' आपण मोजले पण निसर्गाला नेहमीच मोठी किंमत मोजावी लागते. आज झाड, औद्योगिकीकरण हा विकासाचा समानार्थी शब्द बनला आहे.

पर्यावरण असंतुलन हे केवळ नेत्याची जबाबदारी किंवा देशाची वा सरकारची नसते. प्रत्येक व्यक्तीला प्रभावी प्रयत्न करावे लागतील.

पर्यावरणीय असमतोलामुळे आपल्याला पावसाची कमतरता, उष्मा, कमी कालावधीत जास्त पाऊस, पूर किंवा दुष्काळ यांचा सामना करावा लागतो. रोगराई पसरत आहे. वातावरणात विरघळणारे विषारी वायू ओझोनच्या थरावर परिणाम करीत आहेत.

पर्यावरणीय असंतुलनाची दोन मुख्य कारणे आहेत. एक म्हणजे वाढती लोकसंख्या आणि दुसरे म्हणजे वाढत्या मानवी गरजा आणि उपभोगवाद. या दोन्हींचा नैसर्गिक संसाधनांवर प्रभाव पडतो आणि त्याची वहनक्षमता सतत कमी होत आहे. झाडे तोडणे जमिनीचे उत्खनन, पाण्याचा गैरवापर आणि वातावरणाचे प्रदूषण यामुळे पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

